


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक ४३ * नांदेड * शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# अजित पवारांच्या विमान अपघाताची एआयबी चौकशी

## केंद्रीय हवाई उड्डाण मंत्रालयाकडून निर्देश



**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या संदर्भात केंद्रीय उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी एएआयबीची चौकशी लावली आहे.

एएआयबी ही स्वतंत्र चौकशी संस्था असून ती केंद्रीय हवाई उड्डान मंत्रालयाच्या अंतर्गत येत नाही. या चौकशी यंत्रणेला जगातील कोणत्याही चौकशी यंत्रणेची मदत मागून या अपघाताची चौकशी करता येते अशी तरतूद आहे. त्यामुळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी दोन दिवसांपूर्वी पत्रकार परिषद घेऊन गंभीर आरोप केले आहेत. तसेच, या घटनेची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चौकशी झाली पाहिजे, अशीही मागणी त्यांनी केली होती. त्यानुसार, आता चौकशी सुरू झाल्याचे दिसून येते.

राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल केंद्रीय हवाई उड्डाण मंत्री असताना एएआयबीची स्थापन करण्यात आली होती. आपल्या देशात विमान दुर्घटनेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी करण्याकरिता संघटना पाहिजे म्हणून या चौकशी समितीची निर्मिती करण्यात आली होती. दुर्घटनेतील सत्य समोर आलं पाहिजे आणि अपघातसंदर्भाने मुळात दोनच गोष्टी या चुकीच्या असू शकतील. एकतर वैमानिकाचा दोष किंवा विमानाचा दोष. त्यामुळे अपघाताची सगळी चौकशी झाली पाहिजे अशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मागणी आहे. या पलीकडे कोणती चौकशी करण्याची समिती असेल त्याची सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मागणी करेन. पण, एएआयबीला चौकशीचे सर्वाधिकार आहेत, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी दिली. त्यामुळे, गेल्या काही दिवसांपासून आमदार रोहित पवार यांच्याकडून सातत्याने अपघात की घातपात या अनुषंगाने चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी केली जात असताना आता ही चौकशी सुरू झाल्याचे समोर आलं आहे.

दरम्यान, अजित पवार यांच्या विमानाचा अपघात झाला की घातपात यावरुन शंका उपस्थित होत आहेत. राष्ट्रवादीच्या नेत्यांकडून सातत्याने या विमान अपघाताच्या सखोल चौकशीची मागणी केली जात आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या चौकशीच्या मागणीसंदर्भात नागरी उड्डाण मंत्र्यांना पत्र लिहिले होते. आता, केंद्रीय मंत्रालयाकडून या विमान अपघाताची एएआयबी चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. त्यामुळे, आमदार रोहित पवारांच्या सातत्याच्या मागणीनंतर दुर्घटनेची सखोल चौकशी सुरू झाल्याचं दिसून येतं.

# टी २० वर्ल्डकपमधील भारत-पाकिस्तान मॅचवर पावसाचे सावट

**कोलंबो (वृत्तसंस्था)–** आयसीसी पुरुष टी २० वर्ल्डकपमध्ये रविवार १५ फेब्रुवारी २०२६ रोजी कोलंबोच्या प्रेमदासा स्टेडियममध्ये भारत आणि पाकिस्तान यांचा सामना होणार आहे. भारतीय वेळेनुसार हा सामना संध्याकाळी सात वाजता सुरू होणार आहे. हा यंदाच्या वर्ल्डकपमधील २७ वा साखळी सामना असेल. क्रिकेटप्रेमींचे लक्ष असलेल्या या हायव्होल्टेज सामन्याआधीच एक चिंता वाढवणारी बातमी आली आहे. टी ट्वेंटी वर्ल्डकपमधील भारत - पाकिस्तान सामन्यावर पावसाचे सावट घोंगावत आहे. यामुळे क्रिकेटप्रेमी चिंतेत आहेत.

भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ यंदाच्या वर्ल्डकपसाठी ए ग्रुप अर्थात अ गटामध्ये आहेत. भारताने अमेरिकेविरुद्धच्या सामना २९ धावांनी आणि नामिबियाविरुद्धचा सामना ९३ धावांनी जिंकला आहे. दोन्ही साखळी सामने जिंकल्यामुळे भारत चार गुण आणि +३.०५० च्या नेट रनरेटसह गटात अव्वलस्थानी आहे. पाकिस्तानने नेदरलँड विरुद्धचा सामना ३ विकेट राखून आणि अमेरिकेविरुद्धचा सामना ३२ धावांनी जिंकला आहे. हे दोन्ही साखळी सामने जिंकल्यामुळे पाकिस्तान चार गुण आणि +०.९३२ च्या नेट रनरेटसह गटात दुसरे स्थान पटकावले आहे.

भारताचा रविवार १५ फेब्रुवारी रोजी पाकिस्तान विरुद्ध आणि बुधवार १८ फेब्रुवारी रोजी नेदरलँड विरुद्ध खेळणार आहे. नेदरलँड विरूद्धच्या सामन्यात भारत जिंकण्याची शक्यता गृहित धरली तरी गटातले अव्वल स्थान राखण्यासाठी आणि सुपर ८ फेरीकरिता लिलया पात्र होण्यासाठी भारताला पाकिस्तान विरुद्ध विजय मिळवणे आवश्यक आहे. यामुळेच पाकिस्तान विरूद्धच्या सामन्यासाठी भारतीय संघ तयारीला लागला आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षांची १५ दिवसांत निवड

## सुनेत्रा पवारांच्या नावावरच शिक्कामोर्तब होणार?

**मुंबई (प्रतिनिधी)–** दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची धुरा नेमकी कोणाकडे जाणार यावरुन जोरदार चर्चा रंगली आहे. तसेच, दोन राष्ट्रवादीच्या विलिनीकरणावरुनही दोन्ही पक्षाच्या नेत्यांची वेगवेगळी विधाने राजकीय वर्तुळात चर्चेत आहे. त्यातच, अजित पवारांच्या मृत्यूनंतर ४ थ्या दिवशीच त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. या शपथविधी सोहळ्यावरुन राजकीय चर्चा होत होता. आता, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष कोण होणार याची उत्सुकता सर्वांनाच आहे. राष्ट्रवादीच्या आमदार, खासदारांकडून सुनेत्रा पवार यांचेच नाव घेतले जात आहे. त्यातच, राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षांची निवड येत्या १५ दिवसांत होणार असल्याची माहिती आहे.

उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार आज सकाळपासूनच पुण्यातील सर्किट हाऊस येते आहेत. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निकालानंतर विजयी झालेल्या सदस्यांच्या भेटीसाठी घेत आहेत. त्यातच, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राजकीय सल्लागार नरेश अरोरा यांचे बंधू सुनेत्रा पवार यांच्या भेटीसाठी दाखल झाले असून पार्थ पवार आणि जय पवार हेही पुण्यातील सर्किट हाऊस या ठिकाणी पोहोचले आहेत. एकीकडे या भेटीची चर्चा सुरू असतानाच आता राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षांची निवड पुढील १५ दिवसांत होणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.

राष्ट्रवादी कॅाग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवड येत्या १५ दिवसात होणार असून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचीच राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड होणार असल्याचीही माहिती आहे. राष्ट्रीय कार्यकारिणी निवडणूक झाल्यानंतरच राष्ट्रवादीच्या विलीनीकरणासंदर्भात पुढची चर्चा होईल, अशीही माहिती मिळत आहे.

# पोलीस भरतीसाठी येणाऱ्या उमेदवारांच्या आरोग्य आणि सुरक्षेवर विशेष लक्ष –अबिनाश कुमार

## नांदेडमध्ये १९९ पोलीस शिपाई पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू





**नांदेड (प्रल्हाद कांबळे)–** नांदेड जिल्हा पोलीस दलाच्या रिक्त झालेल्या आस्थापनेवर १९९ पोलीस शिपाई पदाची भरती पोलीस मुख्यालय मैदानावर सुरू आहे. भरतीसाठी आलेल्या उमेदवारांच्या आरोग्याची आणि सुरक्षेची विशेष काळजी घेतली जात आहे. जिल्ह्यातील १९९ पोलीस शिपाई पदांच्या भरतीसाठी ११ फेब्रुवारीपासून मोठ्या उत्साहात प्रक्रिया सुरु झाली आहे. या प्रक्रियेसाठी सुमारे १४ हजार ६०० अर्ज प्राप्त झाले आहेत. भरती प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी संपूर्ण प्रक्रिया डिजिटल आणि ऑटोमेटेड पद्धतीने राबवली जात आहे. शारीरिक चाचणीचे निकाल उमेदवारांना त्याच दिवशी पोलीस अधिक्षक कार्यालयातील नोटीस बोर्डवर उपलब्ध करून दिले जात आहेत, जेणेकरून कोणत्याही शंका-कुशंकांना वाव राहणार नाही, अशी माहिती पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी 'गोदातीर समाचार'शी बोलताना दिली.

यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक सूरज गुरव, अर्चना पाटील, सहाय्यक पोलीस अधीक्षक शशांथ गौडा, पोलीस उपाधीक्षक (गृह) डॉ. अश्विनी जगताप आणि उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने, श्याम पानेगावकर यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी व्यवस्थापनासाठी उपस्थित होते.

भरती प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी सुमारे ५० अधिकारी आणि २०० पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विशेष म्हणजे वैद्यकीय पथक, रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलाचे एक वाहन तयार ठेवण्यात आले आहेत.

दररोज सुमारे ११०० उमेदवार १०० मीटर धावणे, १६०० मीटर धावणे आणि गोळाफेक यासारख्या मैदानी चाचण्यांमध्ये आपले नशीब आजमावत आहेत.

बीड येथील दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर, नांदेड पोलीस प्रशासनाने उमेदवारांच्या आरोग्याची आणि सुरक्षेची विशेष काळजी घेतली आहे. मैदानावर शुद्ध पिण्याच्या पाण्यासह सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

गेल्या अनेक महिन्यांपासून विविध **(पान ३ वर...)**

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज नांदेडमध्ये



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबई येथून विमानाने दुपारी १ वा. नांदेड विमानतळ येथे आगमन व हेलिकॉप्टरने पोहरादेवी जि. वाशिम कडे प्रयाण करतील. पोहरादेवी वाशिम येथून सायं. ४ वा. नांदेड विमानतळ येथे आगमन व शासकीय विमानाने मुंबईकडे प्रयाण करतील.

# संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज ९ मार्चपर्यंत स्थगित



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** लोकसभेतील अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा शुक्रवारी संपला. पीठासीन अधिकारी संध्या राय यांनी सभागृहाचे कामकाज ९ मार्चपर्यंत तहकूब केले. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा आता ९ मार्चपासून सुरू होईल आणि २ एप्रिलपर्यंत चालेल. दरम्यान लोकसभेपाठोपाठ राज्यसभेचे देखील कामकाज ९ मार्चपर्यंत स्थगित करण्यात आले.

लोकसभेचे कामकाज सकाळी ११ वाजता सुरू झाले तेव्हा काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांच्या सदस्यांनी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांच्या राजीनाम्याची मागणी करत गोंधळ घातला. परिणामी, कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. दुपारी १२ वाजता कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर, पीठासीन अधिकारी संध्या राय यांनी जाहीर केले की अनेक सदस्यांनी स्थगन प्रस्तावासाठी सूचना सादर केल्या आहेत, ज्या फेटाळण्यात आल्या. त्यानंतर त्यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे नाव घेतले.

प्रधान यांनी त्यांच्या मंत्रालयाशी संबंधित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी सभागृहाचे कामकाज सादर केले. यानंतर त्यांच्या संबंधित मंत्रालयांशी संबंधित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी सभागृहात मांडले.

# विलिनीकरणानंतर अजितदादांकडे नेतृत्व देणार होतो –प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे

**मुंबई (प्रतिनिधी)–** मागील अनेक दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी पक्षाचे विलिनीकरणाबाबत चर्चा सुरू आहेत. आता राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून मोठा दावा करण्यात आला आहे. विलिनीकरण झाल्यानंतर पक्षाचे संपूर्ण नेतृत्व अजित पवार यांच्याकडे सोपवण्याचा निर्णय आमचा होता, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी म्हटले आहे.

# शेअर बाजार क्रॅश, गुंतवणूकदारांचे ७.४० लाख कोटी बुडाले



**मुंबई (प्रतिनिधी)–** भारतीय शेअर बाजारात आजचा दिवस घसरणीचा ठरला. आयटी कंपन्यांच्या शेअरची विक्री, जागतिक दबावामुळं भारतीय शेअर बाजारात आज भूकंप झाला. ट्रेडिंग दरम्यान सेन्सेक्स ११०० अंकांनी कोसळला तर निफ्टीमध्ये देखील ३५० अंकांची घसरण झाली. या घसरणीमुळं गुंतवणूकदारांचे ७.४० लाख कोटी बुडाले.

सेन्सेक्स शुक्रवारी (१३ जानेवारी) रोजी १.२५ टक्क्यांनी म्हणजेच ११४० अंकांनी घसरल्याचं पाहायला मिळालं.. गुरुवारी सेन्सेक्स ८३६७४.९२ अंकांवर बंद झाला होता, त्या तुलनेत आज सेन्सेक्स ८२५३४.५५ अंकांपर्यंत खाली आला होता. अखेर बाजार बंद झाला तेव्हा सेन्सेक्स १०४८ अंकांनी घसरुन ८२६२७ अंकांवर बंद झाला. निफ्टीचा विचार केला तर ३३६ अंकांनी घसरुन २५४७१ अंकावर आला.

सेन्सेक्सवर बजाज फायनान्स, स्टेट बँक ऑफ इंडिया वगळता इतर कंपन्यांच्या शेअरमध्ये घसरण झाली. हिंदूस्तान युनीलिवर, इटरनलचे शेअर चार टक्क्यांनी घसरले. टाटा स्टील, टायटन, टीसीएस, पॉवरग्रीड आणि रिलायन्स इंडस्ट्रीजचे शेअर २ टक्क्यांनी घसरले. बीईएल, एशियन पेंटस, महिंद्रा अँड महिंद्रा, एचडीएफसी बँक, अदानी पोर्टस, एचसीएल टेक्नोलॉजीज, एनटीपीसी, इन्फोसिस, आयटीसी, कोटक महिंद्रा बँक, आयसीआयसीआय बँक, इंडिगोच्या शेअरमध्ये एक ते दोन टक्के घसरण झाली. सनफार्मा, ट्रेंट, बजाज फिनसर्व्ह, मारुती सुझुकी, भारती एअरटेल एक्सिस बँक, अल्ट्राटेक सिमेंट आणि एल अँड टीचे शेअर घसरणीसह बंद झाले.

# ऑस्ट्रेलियाला झिम्बाब्वेने हरवले

## ऑस्ट्रेलियावर वर्ल्ड कपबाहेर जाण्याचं संकट

**कोलंबो (वृत्तसंस्था)–** टी २० वर्ल्ड कपमध्ये शुक्रवारी ऑस्ट्रेलियाला झिम्बाब्वे विरुद्ध २३ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. टी २० वर्ल्ड कपमध्ये २००७ मध्ये देखील झिम्बाब्वेनं ऑस्ट्रेलियाला पराभूत केलं होतं. कोलंबोच्या आर. प्रेमदासा स्टेडियममध्ये झालेल्या मॅचमध्ये झालेल्या पराभवाननंतर कॅप्टन ट्रॅविस हेडनं सामन्यात कुठं चुकलं ते सांगितलं आहे. झिम्बाब्वेनं पहिल्यांदा फलंदाजी करताना २० ओव्हरमध्ये २ बाद १६९ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियन संघ १९.३ ओव्हरमध्ये १४६ धावांवर बाद झाला.

झिम्बॉब्वेनं ऑस्ट्रेलियाला २३ धावांनी पराभूत करत टी २० वर्ल्ड कपमध्ये मोठा उलटफेर केला. या पराभवाबद्दल बोलताना कर्णधार ट्रॅविस हेड म्हणाला की हा पराभव निराशाजनक आहे. मात्र, २०२३ च्या वनडे वर्ल्ड कपमध्ये देखील अशाच प्रकारची स्थिती होती.




# २५ फेब्रुवारीपासून 'संगीत शंकर दरबार'चे आयोजन; दिग्गज कलावंतांची मांदियाळी!




**नांदेड (प्रतिनिधी)–** भारताचे माजी केंद्रीय गृहमंत्री, माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्राच्या जलसंस्कृतीचे जनक कै.डॉ. शंकरराव चव्हाण आणि कुसुमताई चव्हाण यांच्या स्मृतिप्रित्यर्थ महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान खासदार अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने आयोजित केल्या जाणाऱ्या 'संगीत शंकर दरबार' महोत्सवाचे हे २२ वे वर्ष असून २५ फेब्रुवारीपासून या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

सालाबादाप्रमाणे यावर्षीही भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी डॉ. मैसूर मंजुनाथ व श्री मैसूर नागराज, पं.रघुनंदन पणशीकर, अनुराधा कुबेर, रूचिरा केदार, आदित्य मोडक, अनुपम जोशी, मंगेश बोरगावकर हे सर्व कलाकार आपल्या कलेचे सादरीकरण करणार आहेत.

अवघ्या मराठवाड्यातील संगीत रसिक ज्या महोत्सवाची आतुरतेने वाट पाहत असतात अशा या संगीत महोत्सवाचे हे बाविसावे वर्ष असून संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. अमितताई चव्हाण यांच्या नियोजनाखाली संपन्न होणाऱ्या कार्यक्रमात यावर्षी २५ फेब्रुवारी (बुधवार) रोजी अनुपम जोशी (सरोद), रूचिरा केदार (शास्त्रीय गायन), पं. रघुनंदन पणशीकर (शास्त्रीय गायन) असे कार्यक्रम होणार आहेत. याच कार्यक्रमात 'संगीत शंकर दरबार जीवनगौरव पुरस्कार -२०२६' चे वितरण होणार आहे.

२६ फेब्रुवारी (गुरूवार) रोजीच्या कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी ०५:३० वाजता आदित्य मोडक (शास्त्रीय गायन), अनुराधा कुबेर (शास्त्रीय गायन) व डॉ. मैसूर मंजुनाथ व श्री. मैसूर नागराज (व्हायोलिन जुगलबंदी) यांच्या कार्यक्रमाने सांगता होणार आहे.

२७ फेब्रुवारी (शुक्रवार) हा 'मराठी भाषा गौरव दिवस'. या दिवशी पहाटे ०६:०० वाजता 'मराठी पहाट' हा कार्यक्रम होणार असून यात प्रसिद्ध गायक मंगेश बोरगावकर व संच यांचा 'माय मराठी, सूर मराठी' हा आगळावेगळा मराठी सुगम संगीताचा **(पान ३ वर...)**

# २७ फेब्रुवारीपासून तीन दिवसीय 'कुसूम महोत्सव'




**नांदेड (प्रतिनिधी)–** 'कुसुम महोत्सव' यावर्षी २७, २८ फेब्रुवारी आणि १ मार्च, असा तीन दिवस असणार आहे. या महोत्सवातील सर्व कार्यक्रम नांदेड शहरातील यशवंत महाविद्यालयाच्या प्रांगणात होतील. यासोबतच पहिल्यांदा मराठी पहाट हा कार्यक्रम कुसुम सभागृहात घेण्यात येणार आहे अशी माहिती आमदार श्रीजया चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. शंकरराव चव्हाण व कै.सौ. कुसुमताई चव्हाण यांच्या स्मृतिप्रित्यर्थ २०२० मध्ये माजी आमदार अमिता चव्हाण यांच्या संकल्पनेतून हा महोत्सव सुरु करण्यात आला. कोरोनाचे एक वर्ष वगळता दरवर्षी हा उपक्रम सातत्याने राबवला जात आहे.

शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता 'द फोक मराठी' हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा १०० कलावंतांचा संगीत आणि नृत्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमातून महाराष्ट्रातील लोककला, लोकवाद्य तसेच लोकनृत्यांचा आनंद घेता येईल. या कार्यक्रमाचे निवेदन सुप्रसिद्ध आरजे अमित करणार असल्याचे आमदार श्रीजया चव्हाण यांनी सांगितले.

शनिवार, दि. २८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता हिंदी चित्रपट क्षेत्रातील नायिकांवर आधारित 'कलर्स ऑफ बॉलीवूड' हा 'फॅशन शो' आयोजित करण्यात आला आहे. या 'फॅशन शो'चे परिक्षण करण्यासाठी 'लग्नानंतर होईलच प्रेम' य़ा टीव्ही मालिकेतील काव्या आणि पार्थची लोकप्रिय जोडी अर्थात सुप्रसिद्ध कलावंत ज्ञानदा रामतीर्थकर आणि विजय आंदळकर उपस्थित राहणार आहेत.

या शिवाय याच दिवशी कविता राम, मदन शुक्ला, दत्तात्रय मेस्त्री, रेशमा चतुरे या लोकप्रिय व प्रतिभाशाली गायक-गायिकांच्या म्युझिकल नाईटचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाचे निवेदन सुप्रसिद्ध अँकर स्वप्नील जाधव करतील.

रविवार, दि. १ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता पद्मश्री पुरस्कार विजेते, सुप्रसिद्ध गायक कैलाश खेर यांचा 'कैलासा लाईव्ह' हा कॉन्सर्ट होणार आहे. **(पान ३ वर...)**

# कॉपीमुक्त अभियान 'हायटेक' परीक्षा केंद्रांवर ड्रोनची गस्त





**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्ह्यात इयत्ता १२ वीच्या परीक्षा १० फेब्रुवारी २०२६ पासून सुरू झाल्या आहेत. आता परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडण्यासाठी १६ फेब्रुवारी रोजी इयत्ता १२ च्या भौतिकशास्त्र विषयाच्या पेपरपासून परीक्षा केंद्र परिसरावर ड्रोन कॅमेराद्वारे गस्त घालण्यात येणार आहे. त्यामुळे आता जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांच्या निर्देशानुसार कॉपीमुक्त अभियान आता हायटेक झाला आहे.

इयत्ता १२ वीच्या ११२ परीक्षा केंद्रांवर १० फेब्रुवारीपासून झूम वेबकास्टद्वारे परीक्षा काळात थेट प्रक्षेपण केले जात आहे. हे प्रक्षेपण बैठे पथकाच्या माध्यमातून करण्यात येत असून, गैरप्रकार टाळण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी कार्यालय तसेच जिल्हा परिषदेत शिक्षणाधिकारी कार्यालय येथे नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

भारतीय न्याय संहिता कलम १६३ नुसार जमावबंदी लागू करण्यात आली आहे. त्यामुळे परीक्षा काळात परीक्षा केंद्र परिसरात अनधिकृत व्यक्तींनी प्रवेश करू नये किंवा कोणत्याही प्रकारे नकला देण्याचा प्रयत्न करू नये, अन्यथा ड्रोन कॅमेराद्वारे छायाचित्रण करून संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी सर्वांनी सहकार्य करून परीक्षा कॉपीमुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनाला साथ द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ॲड. प्रशांत पवळे यांना शिवसन्मान पुरस्कार जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्हा न्यायालयातील प्रसिद्ध विधिज्ञ ॲड.



प्रशांत पवळे यांना विधी क्षेत्रातील उल्लेखनीय व अतुलनीय कार्याबद्दल यंदाचा प्रतिष्ठेचा शिवसन्मान पुरस्कार जाहीर झाला आहे. छावा श्रमिक संघटना महाराष्ट्र, जिजाऊ प्रतिष्ठान नांदेड तसेच एन.टी.एस.ए. यांच्या संयुक्त विद्यमाने सार्वजनिक शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे.

दि. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता डॉ. हंसराज वैद्य हॉस्पिटल समोर, वजिराबाद (नांदेड) येथे आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते ॲड. पवळे यांचा शिवसन्मान ट्रॉफी व ग्रंथ भेट देऊन गौरव करण्यात येणार आहे.

या सन्मानाबाबत माहिती देताना सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष भास्करराव हंबर्डे, स्वागताध्यक्ष अनिल धामणे पाटील व उपाध्यक्षा श्रीदेवी पाटील यांनी सांगितले की, समाजहिताच्या जाणिवेने कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करणे हा शिवजन्मोत्सवाचा उद्देश असून, ॲड. पवळे यांची निवड त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल म्हणून करण्यात आली आहे.

# अस्वलाच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या शेतकऱ्याच्या वारसांना १० लाखांची मदत




**किनवट (प्रतिनिधी)**– तालुक्याच्या इस्लापूर परिसरातील दयालधानोरा शिवारात दि. १० फेब्रुवारीच्या मध्यरात्री अस्वलाने केलेल्या प्राणघातक हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या एका शेतकऱ्याच्या वारसदारांना शासनाच्यावतीने शुक्रवारी दि. १३ आ. भीमराव केराम यांच्या उपस्थितीत १० लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

दयालधानोरा शिवारात दि. १० फेब्रुवारीच्या रात्री दयाल-धानोरा येथील शेतकरी दत्ता बळीराम जाधव (वय ५०) व रमेश बळीराम जाधव हे दोघे पिकांना पाणी देण्यासाठी आले होते. मध्यरात्रीच्या सुमारास पिकात दडून बसलेल्या अस्वलाने वरील दोघांवर झडप घालून प्राणघातक हल्ला केला.त्या दोघांनी आरडाओरड करताच आजूबाजूचे ७ शेतकरी मदतीला धावले असता हल्लेखोर अस्वलाने त्यांच्यावरही हल्ला चढविला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या दत्ता जाधव यांचा जागीच मृत्यू झाला. तर इतर चौघांना गंभीर दुखापत झाली. वनविभागाने १८ तासांच्या शर्थीचे प्रयत्न करून गुरुवारी दि. १२ रोजी त्या हल्लेखोर अस्वलाला जेरबंद केले होते. अस्वलाच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या दत्ता जाधव यांच्या वारसदारांना शुक्रवार, आ. भीमराव केराम यांच्या उपस्थितीत १० लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला.

यावेळी अप्पारावपेठचे वनपरिक्षेत्र अधिकारी उमेश ढगे यांच्यासह वनकर्मचारी श्रीराम सज्जन, डी. डी. कडमपल्ले, स. वसीम, कृष्णा घायाळ, आर. आर. धनवे, संतोष बारगुडे, गणेश सपकाळ, बी. जे. जाधव, विठ्ठल घुगे, पी. पी. चिंतले, ज्ञानेश्वर माहुरे, कुलदीप पाटील मृतक दत्ता जाधव यांचे वारसदार संजय जाधव, संदीप जाधव, मुली देवका राठोड व करुणा आडे उपस्थित होत्या.

## जिल्ह्यात १४ मार्च रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई व प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने १४ मार्च २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

प्राधिकरणाचे अध्यक्ष नरेंद्र के. ब्रह्मे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा न्यायालय नांदेड व जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालय येथे राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय लोकअदालतीत प्रलंबित तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी प्रकरणे, मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, भूसंपादन प्रकरणे, धनादेश अनादरीत झाल्याबाबत प्रकरणे तसेच कौटुंबिक न्यायालयातील तडजोड होण्यायोग्य प्रकरणे, ग्राहक तक्रार निवारण मंच, सहकार न्यायालय व कामगार न्यायालयातील प्रकरणे ईत्यादी तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

# महिलांचे राजकारणातील कर्तृत्त्व वाखाणण्यासारखे –डॉ. लक्ष्मी पुरणशेट्टीवार



**नांदेड (प्रतिनिधी)**– महिलांमध्ये राजकीय नेतृत्त्व करण्याची क्षमता आहे. त्यांचा राजकारणातील सहभाग वाखाणण्यासारखा असून, समाजकारणातून राजकारणाकडे हा त्यांचा प्रवास असतो. महिलांकडे नेतृत्त्व असताना पुरुषांचा हस्तक्षेप अवाजवी आहे. महिलांमधील साहस, धाडस, नेतृत्त्व, कर्तृत्त्व आजमावण्याची आज योग्य वेळ असल्याचे प्रतिपादन राज्यशास्त्रातील सुप्रसिद्ध लेखिका व वक्त्या डॉ. लक्ष्मी पुरणशेट्टीवार यांनी केले.

यशवंत महाविद्यालयातील राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने आयोजित 'महिलांचा राजकारणातील सहभाग' या विषयावरील व्याख्यानात त्या बोलत होत्या. अध्यक्षीय समारोपात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांनी, महिला या केवळ सामाजिक, राजकीय व आर्थिकच नाही तर समाज जीवनाच्या सर्वांगीण क्षेत्राच्या आधारस्तंभ आहेत.

उपप्राचार्य डॉ. कविता सोनकांबळे यांनी आपल्या मनोगतात, विद्यार्थिनींनी मनाशी खुणगाठ बांधली पाहिजे की, स्वतःच्या पायावर उभे राहिल्याशिवाय विवाह करणार नाही; अन्यथा जीवनात दुर्बलता येण्याची शक्यता असते. कुटुंब, समाज आणि राजकारणातील हक्क व सत्तेच्या वाट्यासाठी संघर्ष केल्याशिवाय काहीही प्राप्त होणार नाही.

प्रारंभी प्रास्ताविक डॉ. अजय गव्हाणे यांनी केले. सूत्रसंचालन कु. काजल बुक्तरे, प्रमुख अतिथींचा परिचय कु. विशाखा व्यवहारे आणि शेवटी आभार कु. साक्षी पाटील यांनी मानले.

याप्रसंगी डॉ. वीरभद्र स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. व्याख्यानास डॉ. मीरा फड, डॉ.शिवराज बोकडे यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. व्याख्यानाच्या यशस्वीतेसाठी प्रा. राजश्री भोपाळे, प्रबंधक संदीप पाटील, अधीक्षक कालिदास बिरादार व गजानन पाटील, जगन्नाथ महामुने, नाना शिंदे, ज्ञानेश्वर डाके आदींनी सहकार्य केले.

# नांदेड परिमंडळात २.0३ लाख ग्राहकांना स्मार्ट मीटर

**नांदेड (प्रतिनिधी)**– राज्यातील सर्व वीज ग्राहकांसाठी टीओडी स्मार्ट मीटर बसविण्यात येत आहेत. अचूक वीज वापराची नोंद घेणारे हे स्मार्ट मीटर सौर कालावधीत होणाऱ्या वीज वापराचीही नोंद घेते. सौर कालावधीत होणाऱ्या विजेचा वापर सवलतीच्या दरात असल्याने त्याचे बिलींग स्मार्ट मीटरद्वारेच होते. नांदेड परिमंडळात परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यात २ लाख ३००० स्मार्ट वीज मीटर बसविण्यात आलेले आहेत. अचूक बिलींगसह सवलतीच्या दरातील वीज बिलांचा लाभ स्मार्ट मीटरधारकांना होतो. सौर कालावधीतील वीज दर प्रति युनिट ८० पैसे ते १ रुपयांपर्यंत कमी आहेत.

नवप्रगत तंत्रज्ञानानुसार आणि काळानुरूप विजेच्या मीटरमध्ये वेळोवेळी बदल केले जातात. इलेक्टोमॅग्नेटीक, इलेक्ट्रॉनिक मीटरनंतर आता डिजिटल आणि स्मार्ट मीटरचा कालखंड सुरु झालेला आहे. स्मार्ट मीटरची रिडींग ही मानवी हस्तक्षेपाशिवाय असणार असून, ती टोमेटीक मीटर रिडींग प्रणालीवर अधारित आहे. त्यामुळे ग्राहकांच्या वापरानुसारच त्याचे अचूक बिलींग होते. शिवाय सौर ऊर्जेचे दर पारंपरिक विजेच्या तुलनेत कमी आहेत. सध्या सौरऊर्जा उत्पादन वाढत असल्याने सौर कालावधी अर्थात, दिवसाच्या कालावधीत होणाऱ्या वीज वापरापोटी ग्राहकांना सवलतीच्या दराने वीज पुरवठा करणे वीज नियामक आयोगाच्या नियमानुसार बंधनकारक आहे. दिवसाच्या कालावधीतील वीज वापर नोंदवणे टीओडी (टाईम ऑफ डे) स्मार्ट मीटरच्या माध्यमातूनच शक्य आहे. त्यामुळे जुन्या वीज मीटरच्या ठिकाणी स्मार्ट मीटर बसविणे महावितरणसाठी अत्यावश्यक असल्याने नांदेड परिमंडलासह संपूर्ण राज्यात दि. ९ ते २३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत 'स्मार्ट मीटर पंधरवाडा' साजरा करण्यात येत आहे. या कालावधीत अधिकाधिक संख्येने ग्राहकांना स्मार्ट मीटर पुरविण्यात येणार आहेत. विजेचे स्मार्ट मीटर हे विनामूल्य् असून त्याचा ग्राहकांवर कुठलाही आर्थिक भुर्दंड पडणार नाही. सौर कालावधीतील वीज वापर नोंदीसाठी सौर मीटरच उपयुक्त् असल्याने ग्राहकांची वीज बिलेही कमी होणार आहेत. स्मार्ट मीटरमुळे सरासरी व अंदाजित बील आकारणीचे प्रमाणही शुन्यावर येत आहे. पर्यायाने वीज बिलांच्या तक्रारी संपुष्टात येतील.

नेट मीटरप्रमाणेच घरातील किंवा इमारतीमधील वीज वापर आणि छतावरील सौर प्रकल्पातून निर्माण झालेल्या विजेचे स्मार्ट मीटर मोजमाप करते. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेसाठी स्मार्ट मीटर अत्यंत उपयुक्त आहे.

मागील काही महिन्यांपासून सर्व ग्राहकांच्या दारावर स्मार्ट मीटर बसविण्याचे काम नांदेड परिमंडलात सुरू असून, त्या अंतर्गत हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली विभागात ४६ हजार, नांदेड जिल्ह्यातील भोकर विभागात २८ हजार ८८, देगलूर विभागात २५ हजार ८००, नांदेड शहरी विभागात ६७ हजार ५००, नांदेड ग्रामीण विभागात ४० हजार ७६६, परभणी जिल्ह्यातील परभणी विभागात ३६ हजार १७० तर सेलू विभागात १९ हजार ५८२ ग्राहकांच्या दारावर टीओडी स्मार्ट मीटर बसविण्यात आलेले आहेत. बसविण्यात येणारे मीटर्स हे प्री-पेड नसून जुन्या पद्धतीनुसार वीज वापरानंतर एक महिन्यांनंतरच त्याचे बील भरावयाचे आहे. स्मार्ट मीटर बसविण्यात आलेल्या ग्राहकांना सौर कालावधीनुसार विजेच्या दरात सवलत देण्यात येते.

**पान १ वरून...**

**पोलीस भरतीसाठी येणाऱ्या...**

अकॅडमी आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली तयारी करणाऱ्या तरुणांमध्ये या भरतीबाबत प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे. कठोर मेहनत आणि घाम गाळल्यानंतर आता प्रत्यक्ष मैदानात उतरण्याची संधी मिळाल्याने उमेदवार समाधानी दिसत आहेत. ही भरतीप्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक असून केवळ पात्र उमेदवारांनाच पोलीस दलात सेवेची संधी मिळेल, असे अबिनाश कुमार यांनी स्पष्ट केले आहे.

मैदानी चाचणीनंतर लेखी परीक्षेचा टप्पा पूर्ण केला जाईल आणि येत्या २३ फेब्रुवारीपर्यंत या संपूर्ण भरती प्रक्रियेचा अंतिम निकाल जाहीर केला जाईल, असा विश्वास पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी व्यक्त केला आहे. पहाटे साडेतीन वाजल्यापासून ते दुपारी बारा वाजेपर्यंत ही भरती प्रक्रिया सुरू असल्याने पोलीस अधिकारी, कर्मचारी नेमून दिलेल्या ठिकाणी आपापले कर्तव्य बजावत असून, येणाऱ्या प्रत्येक उमेदवारांची शंका निरसन करण्याचे काम करत आहेत. या मैदानामध्ये शंभर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून, उमेदवाराच्या प्रत्यक्ष समोरासमोर त्याने केलेल्या चाचणीचे गुण देण्यात येत आहेत. उमेदवार जोपर्यंत समाधान होणार नाही तोपर्यंत त्याला पुढील चाचणीला पाठविण्यात येत नाही. एकंदरीत भरती प्रक्रिया पारदर्शक सुरू असून, कुठल्याही अफवांना उमेदवारांनी किंवा पालकांनी बळी पडू नये, असे आवाहन पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी 'गोदातीर समाचार'शी बोलताना केले आहे.

------------

**२५ फेब्रुवारीपासून 'संगीत शंकर दरबार'...**

कार्यक्रम कुसुम सभागृहात होणार आहे.

तीन दिवस चालणाऱ्या या संगीत महोत्सवातील कार्यक्रम यशवंत महाविद्यालयाच्या क्रीडा मैदानावर उभारण्यात येणाऱ्या भव्य स्वरमंचावर व कुसुम सभागृह येथे संपन्न होणार आहेत. रसिकांचे भावविश्व समृद्ध करणाऱ्या आणि त्यांच्या उदंड प्रेमाच्या बळावर अवघ्या दोन दशकांत भारतातील अग्रगण्य संगीत महोत्सवांच्या यादीत समाविष्ट झालेल्या 'संगीत शंकर दरबार' महोत्सवाचा अधिकाधिक रसिकांनी लाभ घेण्याचे आवाहन श्री शारदा भवन सोसायटीचे अध्यक्ष अशोकराव चव्हाण, उपाध्यक्षा सौ. अमितताई चव्हाण, सचिव डी. पी. सावंत, सहसचिव प्राचार्य डॉ. रावसाहेब शेंदारकर, कोषाध्यक्ष ॲड. उदयराव निंबाळकर तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि संयोजन समिती सदस्य संजय जोशी, रत्नाकर आपस्तंभ, गिरीश देशमुख, डॉ. विश्वाधार देशमुख यांनी केले आहे.

संगीत क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या ज्येष्ठ कलावंताला दरवर्षी 'संगीत शंकर दरबार जीवन गौरव पुरस्कार' दिला जातो. यावर्षीचा जीवन गौरव पुरस्कार बनारस घराण्याचे प्रसिद्ध तबला वादक पंडित शारदा सहाय यांचे पट्टशिष्य डॉ. राम बोरगावकर (लातूर) यांना २५ फेब्रुवारी रोजीच्या मुख्य कार्यक्रमात प्रदान केला जाणार आहे.

------------

**२७ फेब्रुवारीपासून तीन...**

या शिवाय दरवर्षीप्रमाणे कुसुम महोत्सवाचे तीनही दिवस रोज सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत शॉपिंग व फूड फेस्टिवल सुरु राहील. कुसुम महोत्सवाच्या माध्यमातून नांदेड जिल्ह्यातील महिला बचत गट व उद्योजकांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न असतो. कुसुम महोत्सवाला मिळणारा प्रतिसाद दरवर्षी वाढत असून, या वर्षी शॉपिंग फेस्टिवलमध्ये तब्बल १५० स्टॉल्स राहणार आहेत. या ठिकाणी दैनंदिन गरजेच्या वस्तुंपासून हस्तकलेच्या नावीन्यपूर्ण वस्तुंची विक्री आणि प्रदर्शन असते.

तसेच यावर्षीच्या फूड फेस्टिव्हलमध्येही ५० स्टॉल्स राहणार आहेत. या ठिकाणी नांदेडकरांना वेगवेगळ्या प्रकारच्या खाद्य पदार्थांचा आनंद लुटता येईल. या वर्षीच्या कुसुम महोत्सवात शॉपिंगचे १५० आणि खाद्य पदार्थांचे ५० असे एकूण २०० स्टॉल्स असतील.

यावेळी माजी आमदार अमिता चव्हाण, माजी पालकमंत्री तथा श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सचिव डी. पी. सावंत, महापौर कविता मुळे, नगरसेवक किशोर स्वामी, संजय जोशी, रत्नाकर अपस्तंभ, गिरीश देशमुख, प्रा. डॉ. विश्वाधार देशमुख, माजी महापौर मंगला निमकर, माजी महापौर शैलजा स्वामी, रंजना सावंत, मृणाल राजूरकर यांची उपस्थिती होती.

# किनवट रेल्वे स्थानकात मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची भाजयुमोची मागणी



**किनवट (प्रतिनिधी)**– किनवट रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक २ च्या पूर्व बाजूस अप्रोच रोड, वाहनतळ व आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, तसेच शिवाजीनगर येथील रेल्वे अंडरब्रिजच्या निकृष्ट व अपूर्ण कामाबाबत तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष स्वागत आयनेनीवार यांनी केली आहे

या संदर्भात दक्षिण मध्य रेल्वे, नांदेड विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांना दिलेल्या निवेदनात आयनेनीवार यांनी म्हटले आहे की, किनवट रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडील सरस्वती विद्या मंदिर परिसर, सुभाषनगर, मांडवा, बेल्लोरी, पिंपळगाव, मंगाबोडी, हटकरखोरी, झेंडीगुडा, घोगरवाडी, नागझरी कॅम्प, सोनापूर आदी गावांतील नागरिक मोठ्या प्रमाणात ये-जा करतात. मात्र प्लॅटफॉर्म क्र. २ च्या पूर्व बाजूस योग्य अप्रोच रोड, वाहन पार्किंग व इतर सुविधा नसल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मुख्य प्रवेशद्वार विरुद्ध दिशेला असल्याने नागरिकांना मोठा फेरा मारावा लागतो. याचा सर्वाधिक त्रास वृद्ध, महिला, विद्यार्थी व रुग्णांना होत आहे. शिवाजीनगर भागातील रेल्वे अंडरब्रिजचे काम निकृष्ट दर्जाचे व अपूर्ण असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## अवैध कत्तलीसाठी जाणारे ११ गोवंश कसायाच्या तावडीतून मुक्त; भोकर पोलिसांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)**– भोकर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून गारगोटवाडी मार्गे अवैध कत्तलीसाठी एका वाहनातून निर्दयीपणे कोंबून ११ गोवंशांची कोंबून वाहतूक केली जात होती. याची गुप्त माहिती मिळताच पोलिसांनी सदर वाहन ताब्यात घेतले. पोलीस दिसताच वाहनचालक वाहन सोडून पळून गेला. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. जप्त केलेल्या तसेच जप्त केलेले गोवंश गोशाळेत दाखल केले आहेत.

भोकर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक मोहन राठोड यांच्या पथकाला यांच्या पथकाला अवैध गोवंश वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यावरून ही कारवाई करण्यात आली. दि. ११ फेब्रुवारी रोजी रात्री साडेआठच्या सुमारास गोपनीय माहिती मिळाली की, तामसा येथून भोकरकडे गोवंश जनावरे एका पिकअपगाडीमध्ये भरुन कत्तलीसाठी जात आहेत. त्याअनुषंगाने सदरचे वाहन हे बोरगाव रोडने जात असताना त्यास पथकाने थांबवण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने सदरचे वाहन हे भरधाव वेगात हयगई व निष्काळजीपणे चालवून निघून जात असताना त्यास थांबण्याचा इशारा केला असता तो न थांबता तेथून निघून गेला. या वाहनाबाबत माहिती घेतली असता सदरचे वाहन हे किनवट रोडने बटाळा, रेणापूर मार्गे दिवशी येथे गेल्याची माहिती मिळाल्याने त्यामार्गाने वाहनाचा शोध घेत कोळगाव येथे पोलीस पोहोचले. सदरचे पिकअप वाहन हे गारगोटवाडी ते दिवशीकडे जाणारे टर्निंगरोडवरील पुलाजवळील शेतात रोड सोडून खाली गेले असून त्याचा चालक वाहन सोडून पळून गेला असल्याबाबत माहिती मिळाली. चालकाविरुद्ध भोकर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कारेगाव येथे उपासिका धम्म प्रशिक्षण शिबिराचा समारोप



**लोहा (प्रतिनिधी)**– येथून जवळच असलेल्या मौ. कारेगाव येथे भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा लोहाच्या वतीने दहा दिवसीय उपासिका धम्म प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले. या शिबिराचा समारोप माता रमाई जयंती दिनी करण्यात आला.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी रमाई यांच्या जीवन चरित्रावर मान्यवरांची भाषणे झाली. दहा दिवस धम्म प्रशिक्षणास बसलेल्या उपासिकांना भारतीय बौध्द महासभेच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

माता रमाई आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त भीमशाहीर सुमेध एडके यांचा भीम व बुध्द गीतांचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौध्द महासभेचे लोहा तालुकाध्यक्ष बापुसाहेब कापुरे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून बौध्द महासभेचे दक्षिण जिल्हाध्यक्ष हौसाजी वारघडे, जिल्हा सरचिटणीस रत्नाकर महाबळे, महिला जिल्हाध्यक्षा रेखाताई पंडित, संस्कार विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष पी. एम. वाघमारे, पर्यटन उपाध्यक्ष शंकरराव भंडारे, कार्यालयीन सचिव हरी कसबे, पर्यटन सचिव एस. एन. कांबळे, अर्जुन चौदंते, के. के. वाघमारे, केंद्रीय शिक्षक धोंडीबा यानभुरे, महिला सरचिटणीस चित्रलेखा कांबळे, कोषाध्यक्ष अर्चना कांबळे, संस्कार सचिव शोभा कसबे, पर्यटन उपाध्यक्ष मनिषा सिंगनकर, संघटक विद्याताई पंडित, सचिव अनिता भोळे, शहराध्यक्षा कविता बनसोडे, उपासिका धम्म प्रशिक्षणाच्या मुख्य प्रशिक्षक व केंद्रीय शिक्षिका सुजाता आढाव, अनिल गायकवाड, बी. बी. गायसमुद्रे, व्ही. के. कांबळे गुरुजी, वाय. बी. महाबळे, प्रा. राजेश ढवळे, इ. जे. बनसोडे, समता सैनिक दलाचे सुभाष खाडे, सिध्दार्थ ससाणे आदींची होती. सूत्रसंचालन सुनिता गायकवाड यांनी केले तर आभार गौतम हंकारे यांनी मानले.

## उमरी तालुका संजय गांधी निराधार योजनेच्या सदस्य बैठकीत ३९९ अर्ज मंजूर

**उमरी (प्रतिनिधी)**– नायगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश पवार यांनी गेल्या काही दिवसांपूर्वी नायगाव, धर्माबाद व उमरी या तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेच्या समित्या गठीत केल्या. अलीकडेच गेल्या १५ दिवसांत तिन्ही तालुक्याच्या बैठका पार पडल्या. शेकडो लाभार्थ्यांचे अर्ज या बैठकीत मंजूर करण्यात आले.

उमरी तालुक्याची बैठक दि. १० फेब्रुवारी रोजी तहसील कार्यालय उमरी येथे संपन्न झाली. या बैठकीत उमरी तहसीलदार सौ मंजुषा भगत यांनी नवनियुक्त अध्यक्ष व सदस्यांचा शाल, श्रीफळ देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी उपाजिल्हाधिकारी सौ. स्वाती दाभाडे यांनी नवनियुक्त पदाधिकारी व सदस्यांना शुभेच्छा दिल्या. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष डॉ. विक्रम देशमुख हे होते. या बैठकीत पात्र लाभार्थ्यांचे ३९९ अर्ज मंजूर करण्यात आले.

## कलदगाव जि. प. प्रा. शाळेतील शिक्षिकेला निरोप तर नूतन शिक्षिकेचे स्वागत



**अर्धापूर (प्रतिनिधी)**– तालुक्यातील कलदगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत श्रीमती ममता किशोर सोनटक्के यांची बदली झाल्याबद्दल त्यांना निरोप देण्यात आला. तर श्रीमती गीता राजाराम देवपूजे ह्या शिक्षिका शाळेवर रुजू झाल्यामुळे गावकरी मंडळीच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमास शालेय समितीचे अध्यक्ष शंकर गव्हाणे, केंद्रप्रमुख विकास चव्हाण, पं. स.चे सचिन खिल्लारे यांच्या उपस्थितीत गजानन गव्हाणे पाटील यांच्या पुढाकाराने सत्कार करण्यात आला. निरोप व स्वागत कार्यक्रमास केंद्रप्रमुख चव्हाण, केंद्रीय मुख्याध्यापक एस. सावते, शाळेचे मुख्याध्यापक व्ही. एस. लोणे, श्रीमती जी. आर. देवपूजे, अंगणवाडी कार्यकर्ती व्ही. के. शिंदे, चेअरमन दाजीबा पाटील गव्हाणे, सरपंच शाम तिम्मेवारी, उपसरपंच सौ. मंदाकिनी गव्हाणे, सदस्य रवी एंगडे, रावसाहेब गव्हाणे, संभाजी गव्हाणे, माणिकराव गव्हाणे, व्यंकटराव गव्हाणे, देवजी पाटील गव्हाणे, नवनाथ गव्हाणे, बजरंग शिंदे, माधवराव गव्हाणे, गोविंदराव कपाटे, संतोष गव्हाणे, कैलास गव्हाणे, आनंद तिडके आदींसह गावकरी मंडळी उपस्थित होती.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# काय आहे भारताचे Sarvam AI ?

## तुम्ही कसे वापरू शकता? चॅटजीपीटी अन् जेमिनीपेक्षा कसे वेगळे आहे?

**Sarvam AI सर्वम एआय हे एक भारतीय कृत्रिम बुद्धिमत्ता स्टार्टअप आहे. त्याचे ध्येय भारतातील विविध भाषा आणि संस्कृतींनुसार तयार केलेले अद्वितीय एआय मॉडेल तयार करणे आहे. इंग्रजीवर अवलंबून राहण्याऐवजी हिंदी आणि इतर भाषांना प्राधान्य दिल्यामुळे त्याला अनेकदा भारताचे स्वतःचे एआय असे संबोधले जाते. अलीकडेच सर्वम एआयने त्याचे स्पीच मॉडेल बुलबुल व्ही ३ सादर करून आणि जेमिनी आणि चॅटजीपीटीसारख्या लोकप्रिय मॉडेल्सना मागे टाकून चर्चेत स्थान मिळवले. भारताचे स्वतःचे एआय प्लॅटफॉर्म वापरण्यास सोपे आहे आणि चॅटजीपीटी आणि जेमिनीसारख्या एआय मॉडेल्सपेक्षा अधिक चांगले फिचर्सही मिळतात.**




### Sarvam AI कसे वापरावे?

Sarvam AI वापरणे खूप सोपे आहे. तुम्हाला फक्त Google वर सर्वम AI शोधायचे आहे. पहिल्या लिंकवर क्लिक करा आणि तुम्हाला सर्वम AI वेबसाइटवर नेले जाईल. त्यानंतर, ते वापरण्यास सुरुवात करण्यासाठी एक्सपिरियन्स सर्वमवर क्लिक करा. लक्षात ठेवा, सर्वम AI वापरण्यासाठी तुम्हाला लॉग इन करावे लागेल. त्यानंतर, तुम्ही ते वापरण्यास सुरुवात करू शकता.

### सर्वम एआयची खास वैशिष्ट्ये

सर्वम एआयची खास वैशिष्ट्ये म्हणजे ते इंडिक-फर्स्ट दृष्टिकोनाने काम करते. याचा अर्थ त्याचे एआय मॉडेल भारतीय भाषांमध्ये प्रवीण आहे. जर तुम्ही या एआयच्या स्पीच मॉडेलचा वापर केला तर तुम्हाला आढळेल की प्लॅटफॉर्मवर वापरलेले आवाज भारतीय आहेत आणि ते खूप वास्तविक वाटतात. तथापि, जर तुम्ही जेमिनी किंवा चॅटजीपीटी मॉडेल वापरत असाल तर ते अधिक यांत्रिक स्वरात आणि पद्धतीने बोलतात. सर्वम एआयचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्याला मिश्र भाषांमध्ये संवाद साधण्यास अडचण येत नाही. याचा अर्थ असा की त्याचे एआय मानवांप्रमाणेच एकाच गोष्टी बोलताना वेगवेगळ्या भाषा बोलू शकते.

### सर्वम एआयची प्रमुख उत्पादने

सर्वम एआयच्या लोकप्रिय उत्पादनांमध्ये सर्वम-१, बुलबुल व्ही३, सर्वम व्हिजन आणि शुका १.० यांचा समावेश आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की सर्वम-१ हे २ अब्ज पॅरामीटर्स असलेले एक लहान पण शक्तिशाली एआय मॉडेल आहे. हे ४ ट्रिलियन टोकनवर प्रशिक्षित आहे. भाषांतर आणि सारांश निर्मितीसारख्या कामांसाठी ते वापरले जाऊ शकते. त्याचप्रमाणे, अलीकडेच लाँच झालेले बुलबुल व्ही३ हे एक उत्कृष्ट टेक्स्ट-टू-स्पीच मॉडेल आहे जे ११ पेक्षा जास्त भारतीय भाषांमध्ये नैसर्गिक मानवी आवाजात बोलते. सर्वम व्हिजन हे कागदपत्रे वाचण्यासाठी एक ओसीआर मॉडेल आहे, जे जटिल तक्ते, गणितीय सूत्रे आणि हस्तलिखित मजकूर समजून घेण्यात चॅटजीपीटी आणि जेमिनीला मागे टाकते. शिवाय, शुका १.० हे भारतातील पहिले ओपन-सोर्स ऑडिओ भाषा मॉडेल आहे. ते तुमच्या भाषणाला थेट प्रतिसाद देऊ शकते.

### चॅटजीपीटी-जेमिनी सारख्या एआय मॉडेलपेक्षा किती चांगले?

सर्वम एआयची तुलना चॅटजीपीटी किंवा जेमिनी सारख्या एआय मॉडेलशी करणे योग्य वाटत नाही. कारण सर्वम एआय भारताला प्राधान्य देते. तथापि, अशी तीन कामे आहेत जिथे सर्वम एआय चॅटजीपीटी किंवा जेमिनी सारख्या एआय मॉडेलपेक्षा श्रेष्ठ आहे. प्रथम, सर्वम एआयचे सर्वम व्हिजन मॉडेल कागदपत्रे, हस्तलिखित मजकूर आणि गुंतागुंतीच्या तक्ते समजून घेण्यात चॅटजीपीटी आणि जेमिनीला मागे टाकते. हे लक्षात घेण्यासारखे आहे की olmOCR-Bench वर त्याने अचूकतेमध्ये 84.3% गुण मिळवले आहेत, जे गुगल जेमिनी 3 प्रो (80.20%) आणि ओपनएआयच्या मॉडेल्सपेक्षा जास्त आहे. दुसरे म्हणजे, सर्वम एआयचे व्हॉइस आणि स्पीच मॉडेल बुलबुल व्ही 3 भारतीय भाषांमधील मानवांइतकेच नैसर्गिक आणि नैसर्गिक आहे. या बाबतीत, ते लोकप्रिय जागतिक एआय मॉडेल्सना देखील मागे टाकते. ते जेमिनी किंवा चॅटजीपीटी सारख्या मॉडेल्सपेक्षा स्वस्त देखील आहे. इतर मॉडेल्सना भारतीय भाषा समजण्यासाठी 4 ते 8 टोकनची आवश्यकता असते, तर सर्वम ते 1.4 ते 2.1 टोकनमध्ये करते. हे केवळ इंटरनेट आणि वीज वापरावर बचत करत नाही तर लक्षणीयरीत्या जलद कार्य करते.



### स्मार्टफोनवरील व्हॉल्यूम बटणाचे अनेक उपयोग

- गुप्त कॅमेरा बटण : तुम्ही व्हॉल्यूम बटण कॅमेरा बटण म्हणून देखील वापरू शकता. तुम्हाला कोणत्याही सेटिंग्ज सक्षम करण्याची देखील आवश्यकता नाही. जेव्हा तुम्ही तुमच्या फोनचा कॅमेरा चालू करता, तेव्हा तुम्ही व्हॉल्यूम डाउन बटण दाबून फोटो क्लिक करू शकता.
- त्वरित अंधार दूर करा : तुम्ही फ्लॅशलाइट चालू करण्यासाठी व्हॉल्यूम बटणे सेट करू शकता. हे तुम्हाला फ्लॅशलाइट चालू करण्यासाठी फक्त व्हॉल्यूम बटण दाबून अंधार दूर करण्यास अनुमती देते. हा पर्याय Vivo आणि iQOO फोनवर उपलब्ध आहे.
- इनकमिंग कॉल सायलेन्स : व्हॉल्यूम बटणे विशेषतः जेव्हा तुम्हाला इनकमिंग कॉल सायलेन्स करायचा असतो तेव्हा उपयुक्त असतात. हे फीचर विशेषतः मीटिंग दरम्यान आणि जेव्हा तुम्ही सिनेमा हॉलसारख्या ठिकाणी असता तेव्हा उपयुक्त असते.

## रशियात व्हॉट्सअॅप, फेसबुक, यूट्यूबवर बंदी




**टेलिग्रामवर बंदी घालल्यानंतर रशियाच्या पुतिन सरकारने अमेरिकन सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. व्हॉट्सअॅप, यूट्यूब, इंस्टाग्राम आणि फेसबुकसारख्या लोकप्रिय अमेरिकन सोशल मीडिया प्लॅटफॉर्म रशियामध्ये ब्लॉक करण्यात आले आहेत. असे म्हटले जात आहे की तेथील लोक या लोकप्रिय अॅप्सचा वापर करू शकत नाहीत.**

बुधवारी रशियाने लोकप्रिय मेसेजिंग अॅप टेलिग्रामवर बंदी घातली. लोकांना सरकारी मालकीच्या प्लॅटफॉर्मचा वापर करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी पुतिन सरकार हे करत आहे. रशियाची नियामक संस्था रोस्कोमनाडझोरने (Roskomnadzor) सुरक्षेच्या कारणास्तव टेलिग्रामवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला होता. आता प्रमुख अमेरिकन सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरही बंदी घालण्यात आली आहे. या वेबसाइट्सचे डोमेन नाव रशियाच्या राष्ट्रीय डोमेन नेम सिस्टम (DNS) मधून काढून टाकण्यात आले आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, पुतिन सरकारने केवळ प्रमुख अमेरिकन सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरच नव्हे तर आंतरराष्ट्रीय मीडिया संस्थांवरही बंदी घातली आहे. प्रभावित वेबसाइट्समध्ये बीबीसीचाही समावेश आहे. शिवाय अनामिक ब्राउझिंगसाठी वापरला जाणारा टॉर ब्राउझरदेखील ब्लॉक करण्यात आला आहे.

- राष्ट्रीय डीएनएस सिस्टम वापरणे अनिवार्य : रशियामधील इंटरनेट सेवा प्रदात्यांना देशाची राष्ट्रीय डीएनएस सिस्टम वापरणे अनिवार्य झाले आहे. ही सिस्टम रोस्कोमनाडझोर नावाच्या सरकारी एजन्सीच्या देखरेखीखाली चालते. सार्वभौम इंटरनेट कायद्याअंतर्गत इंटरनेट नियंत्रण लागू करणे ही त्याची भूमिका आहे.
- रशियाने हे पाऊल का उचलले? : अनेक अहवाल असे सूचित करतात की रशियाने देशातील परदेशी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि मीडिया वेबसाइट्सचा वापर अक्षरशः बंद करण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. तथापि यामुळे रशियन लोकांना अनेक जागतिक सेवा आणि बातम्यांच्या स्त्रोतांपासून दूर केले आहे.
- व्हॉट्सअॅप कॉलिंग फीचरवर आधीच बंदी : हे लक्षात घ्यावे, की रशियामध्ये अनेक व्हॉट्सअॅप सेवा आधीच बंदी आहेत. गेल्या वर्षी व्हॉट्सअॅप आणि टेलिग्रामची कॉलिंग फीचर्स ब्लॉक करण्यात आली होती. डिसेंबरमध्ये रशियाने अॅपलच्या फेसटाइम आणि स्नॅपचॅटवरही बंदी घातली होती.

# अजब-गजब

# नशिबाने तारले, नशिबानेच मारले!

### हेनरी जिलॅन्डच्या मृत्यूची थरारक कहानी

**लंडन :** आजघडीला मानवाने जवळपास साऱ्याच गोष्टी शक्य करून दाखवल्या आहेत. पण एवढे करूनही तो स्वतःचे नशिब मात्र बदलू शकलेला नाही. जे नशिबात आहे, ते त्यालाच भोगावेच लागते. नशिबात कधी, काय घडेल, हे कळत नसल्याने आयुष्याचा संपूर्ण खेळ नशिबावरच विसंबून असल्याचे दिसून येते... बंदुकीची गोळी लागूनही जीवंत राहिलेल्या हेनरी जिलॅन्डला आपले नशिब किती बलवत्तर आहे, हे अनुभवून प्रचंड आनंद झाला होता. पण त्याच्या नशिबात काही वेगळेच लिहिले होते, जी गोळी लागल्यानंतरही तो जीवंत राहिला त्याच गोळीने पुन्हा त्याचा वेध घेतला आणि जीवे मारले!

अमेरिकेच्या इतिहासात कधी घडली नसेल अशी ही रहस्यमय घटना. मनात शंका- कुशंकांचे काहूर माजवून कोड्यात टाकणाऱ्या या घटनेविषयी माहिती अशी की, हेनरी जिलॅन्ड हा सुखवस्तू घरातला तरुण. विद्यापीठात शिकत असतानाच सोबत शिकणाऱ्या एका सुंदर युवतीवर त्याचा जीव जडला. दोघांचे प्रेम प्रकरण सुरू झाले. असेच काही दिवस गेले. वारंवार याच युवतीसोबत संबंध ठेवायला हेनरी कंटाळला. गुलछबू स्वभावाच्या हेनरीची नजर दुसऱ्या तरुणीच्या शोधात व्यस्त झाली. तो तिला टाळू लागला. हेनरीला आता आपल्यात रस राहिलेला नाही हे पाहून ती युवती प्रचंड निराश झाली. हेनरी केवळ आपल्यावर शरीरावर प्रेम करत होता. त्याचे आपल्यावरील प्रेम केवळ स्वार्थ होता, याची जाणीव होऊन ती प्रचंड संतापली. तिने हेनरीला याचा जाब विचारला. तेव्हा दोघांचे कडाक्याचे भांडण झाले. दोघांनी एकमेकांपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला. तिचे हेनरीवर खरोखर प्रेम करत असल्याने तिला विरह असह्य झाला. तिने गळफास घेऊन घरातच आत्महत्या केली. या युवतीच्या भावाला तिचे प्रेमप्रकरण माहीत होते. हेनरी सुखवस्तू घरातला असल्याने त्याने प्रेमाला विरोध केला नव्हता. आपल्या बहिणीने हेनरीशी लग्न केले तर तिचे चांगलेच होईल, असे त्याला वाटत होते. पण दोघांचे ब्रेकअप होऊन नंतर बहिणीने आत्महत्या केल्याने त्याच्या संतापाचा पारा चढला. त्याने एक दिवस हेनरीला घरात एकटे गाठून त्याच्यावर बंदुकीची गोळी झाडली. गोळी हेनरीच्या शरीरातून आरपार गेली आणि हेनरी कोसळला. हेनरीला ठार केल्याने आपण बहिणीच्या आत्महत्येचा बदला घेतला, असे वाटून तो घरी आला आणि स्वतःवरही त्याने गोळी झाडून घेतली. इकडे हेनरीला गंभीर



अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न करून हेनरीला वाचवले. बंदुकीची गोळी हेनरीच्या शरीरातून आरपार जाऊन एका झाडात घुसली होती. जीवघेणा हल्ला होऊनही वाचल्याचा प्रचंड आनंद हेनरीला झाला होता. केवळ नशिबामुळेच आपण वाचलो, असे तो लोकांना सांगत होता. पण भविष्यात नशिबाने काय वाढून ठेवले आहे, याची त्याला पुसटशी कल्पनाही नव्हती. कारण हा नाटकीय घटनाक्रम इथेच थांबला नाही. या घटनेनंतर दोन वर्षांनी हेनरीच्या डोक्यात घराजवळील झाडे कापण्याचा विचार आला. छोटी छोटी झाडे कापून टाकली गेली पण ज्या झाडात गोळी घुसलेली होती ते जीर्ण, वाळलेले झाड कापून टाकण्यापेक्षा जाळून टाकण्याचा निर्णय हेनरीने घेतला. झाडाच्या सर्व बाजूंनी स्फोटके पेरून स्फोट करण्यात आला. काही क्षणांत झाडाने पेट घेतला. झाडासोबत त्या गोळीने पेट घेतला. गरम झाल्याबरोबर ती गोळी काही कळायच्या आत तिथून उडाली आणि थेट हेनरीच्या छातीत घुसली. हे सर्व काही इतक्या अनपेक्षित आणि आश्चर्यकारकरित्या घडले की लोक अजूनही विश्वास ठेवत नाहीत. सर्वांनाच प्रश्न पडला आहे की हे असे कसे घडू शकते..? पण जे घडले ते पूर्ण सत्य आहे. प्रेमिकेच्या भावाच्या बंदुकीतून सुटलेली गोळी हेनरीच्या मृत्यूचे फर्मान घेऊनच सुटली होती. तिने दोन वर्षांनी पुन्हा आपले कर्तव्य बजावत हेनरीचा वेध घेतला आणि त्याला यमसदनी पाठवले.

## भटक्या प्राण्यांचा बनला तारणहार दयाळू कुत्रा..!

लंडन : सर्वांत प्रामाणिक म्हणून कुत्र्याला ओळखले जाते. त्याच्या प्रामाणिकपणाची अनेक उदाहरणे चर्चेत असतात. केवळ मानवाच्या बाबतीतच नाही तर कुत्रा इतर प्राण्यांच्या बाबतीतही तितकाच दयाळू असतो, याची जाणीव ब्रिटनवासियांना झाली आहे. लंडनचा एक कुत्रा भटक्या प्राण्यांचा तारणहार झाला असून, त्याचे उदार वर्तन पाहून सर्वच जण तोंडात बोटे घालत आहेत... डेव नावाचा हा कुत्राही कधी काळी रस्त्यावरच भटकत होता. अमांडा कॉलिंस यांनी काही वर्षांपूर्वी त्याला घरी आणले आणि सांभाळणे सुरू केले होते. डेव आता मोठा झाला. अमांडा यांच्या अपेक्षांत तो उतरला. अमांडा यांना तक्रार करण्याची संधी कधीही या कुत्र्याने दिली नाही. गेल्या महिनाभरापूर्वी अमांडा यांनी रस्त्यावर अचानक दिसलेल्या एका सशाच्या पिलाला घरी आणले. २५ वर्षीय अमांडांना सुरुवातीला भीती वाटली की डेव त्याला खाऊन टाकेल किंवा नुकसान पोहचवेल. पण त्यांची ही भीती तेव्हा दूर झाली जेव्हा डेव या पिलाजवळ गेला आणि त्याच्या अंगावरची घाण साफ करून त्याला गोंजारू लागला. त्यानंतर अमांडा यांनी मांजरीची दोन पिल्लं आणि चिमणीची दोन पिल्लंही घरी आणली. अमांडाला भटक्या प्राण्यांना जमा करून त्यांची देखभाल करणे फार आवडते. त्यामुळे तिने हे सर्व प्राणी, पक्षी घरी आणले. डेवने या सर्व सहकाऱ्यांना अत्यंत मायेने वागवणे सुरू केले असून, तोच आता त्यांचा तारणहार बनल्याचे चित्र आहे. एक कुत्रा अशा पद्धतीने प्राण्यांचा सांभाळ करतो हे पाहून सर्वच हैराण आहेत.



## तुरुंगात सौंदर्य स्पर्धा... खुनी महिला ठरली ‘मिस जेल’

**साओ पाऊलो (ब्राझिल) : सौंदर्य स्पर्धा आयोजित करण्याचे फॅड सगळीकडेच पसरले आहे. आजकाल शाळा, कॉलेजांमध्येही सौंदर्य स्पर्धा भरवल्या जातात. पण हद्द ही झाली की चक्क जेलमध्ये सौंदर्य स्पर्धा घेण्यात आली! ब्राझिलच्या एका जेलमध्ये महिला कैद्यांची सौंदर्य स्पर्धा पार पडली आणि स्पर्धेची विजेती ठरली चक्क एक खुनी महिला. १९ वर्षांची कैदी रिबेका रायसा हिच्या शिरपेची सौंदर्याचा ताज सजला.**

ब्राझिलच्या मानवाधिकार आणि सामाजिक विकास मंत्रालयाकडून या स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धा केवळ महिला कैद्यांसाठीच होती. ब्राझिलिया शहरातील जेलमध्ये स्पर्धा पार पडली. अंतिम फेरीसाठी १२ स्पर्धक निवडल्या गेल्या होत्या. या वेळी सामान्य ज्ञानाशिवाय इतर कैद्यांसोबत त्यांचा व्यवहार कसा आहे, याची तपासणी करण्यात आली. त्यात रिबेका पहिल्या क्रमांकाची विजेती ठरली. तिला बक्षीस म्हणून करिअर बनविण्यासाठी विशेष प्रशिक्षणाची संधी आणि २९ हजार रुपये देण्यात आले. स्पर्धेच्या दुसऱ्या विजेतीला २२ हजार रुपयांचे बक्षीस तर तिसरीला ११ हजार रुपये प्रदान करण्यात आले. सौंदर्याचा ताज शिरपेची सजल्यानंतर रिबेकाचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. स्पर्धा संपताच तिच्या अंगातून स्पर्धेचा पोशाख काढून घेऊन पुन्हा कैद्याचा पोशाख तिला देण्यात आला तेव्हा ती प्रचंड दुःखी झाली. पत्रकारांशी बोलताना ती म्हणाली, की स्पर्धेत सहभाग घेऊन मला प्रचंड आनंद झाला आहे. सहकारी कैद्यांनी आणि जेलच्या कर्मचाऱ्यांनीही मला प्रोत्साहन दिले होते, असे ती म्हणाली. रिबेकावर खुनाचा आरोप असला तरी हा आरोप मान्य करायला ती तयार नाही. ती म्हणते, की मी कोणाचीही हत्या केलेली नाही. त्यामुळे अजूनही मला आशा आहे की मला न्याय नक्कीच मिळेल. मला जेल झाल्यानंतर सर्वांनी माझी साथ सोडली. ज्याला मी आपलं मानलं होतं, त्या प्रियकरानेही माझ्याशी नाते तोडले. पण मी हारलेले नाही. उच्च न्यायालयात अपील करून मी जेलबाहेर पडणारच आहे, असा विश्वास तिने व्यक्त केला.



# ग्रामपंचायत निवडणुकीचा मार्ग मोकळा? हायकोर्टाच्या आदेशाने सरकारच्या प्रशासक नेमणुकीला ब्रेक

**राज्यातील १४,२३७ ग्रामपंचायतींचा कार्यकाळ २०२६ मध्ये संपणार; सरकारने घेतला होता प्रशासक नेमण्याचा निर्णय**

**मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने या निर्णयाला दिली अंतरिम स्थगिती**

**१७ फेब्रुवारीच्या सुनावणीनंतर ग्रामपंचायत निवडणुका होण्याबाबत स्पष्टता येण्याची शक्यता**



**मुंबई (प्रतिनिधी)** – निवडणुका आरक्षण मुद्यावरून पुढे ढकलल्या आहेत. त्या कधी होणार याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. अशातच आता राज्यातील १४२३७ ग्रामपंचायतींचा कार्यकाळ जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत संपत आहे किंवा संपणार आहे. अशा ग्रामपंचायतींमध्ये निवडणुका न घेता प्रशासक नेमण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला होता. पण आता या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अंतरिम स्थगिती दिली असून पुढील सुनावणी १७ फेब्रुवारी रोजी होणार आहे. यामुळे राज्यातील १४२३७ ग्रामपंचायतींच्या निवडणुका होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राज्यातील १४२३७ ग्रामपंचायतींचा कार्यकाळ हा जानेवारी २०२६ पासून डिसेंबर २०२६ पर्यंतच्या काळात संपणार आहे. आधीच राज्यातील जिल्हा परिषद पंचायत समित्यांच्या निवडणुका या आरक्षण मुद्यावरून पुढे ढकलल्या आहेत. त्या न्यायालयाचा आदेश होताच घेतल्या जातील. यातच आता कार्यकाळ संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्याही निवडणुका घ्याव्या लागणार असल्याने राज्य सरकारने २३ जानेवारी २०२६ रोजी परिपत्रक काढत ग्रामपंचायतींमध्ये निवडणुका न घेता प्रशासक नेमण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयात दाद मागण्यात आली होती.

या आदेशाविरोधात अरविंद दळवी आणि अन्य काही नागरिकांनी न्यायालयात दाद मागताना सरकारचा हा निर्णय ग्रामीण भागातील लोकशाहीसाठी घातक असल्याचा दावा करत निर्णय रद्द करण्याची मागणी केली होती. तसेच ग्रामपंचायत ही स्थानिक स्वराज्य संस्थेची मूलभूत एकक असून निवडून आलेल्या प्रतिनिधींमार्फतच तिचा कारभार चालवला गेला पाहिजे. कार्यकाळ संपण्यापूर्वीच निवडणूक प्रक्रिया पूर्ण करणे ही राज्य निवडणूक आयोगाची जबाबदारी असल्याचे याचिकाकर्त्यांनी म्हटले होते. दरम्यान याचिकेवर न्या. अनिल किलोर आणि न्या. राज वाकोडे यांच्या खंडपीठा समक्ष सुनावणी झाली. यावेळी खंडपीठाने राज्याच्या ग्रामविकास विभागासह राज्य निवडणूक आयोगाला नोटीस बजावून स्पष्टीकरण मागितले आहे. तसेच संबंधित शासन निर्णयाची अंमलबजावणी पुढील आदेशापर्यंत करू नये, असे आदेश देत राज्य शासनाच्या निर्णयाला अंतरिम स्थगिती दिली आहे.

तसेच यावेळी, या आदेशामागील कारणामुळे गैरसमज निर्माण झाला असून स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कार्यपद्धतीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या निर्णयाची सविस्तर कारणमीमांसा आवश्यक असल्याचेही निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. तसेच राज्य शासनाला नोटीस बजावत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देशही दिले असून याचिकेवर पुढील सुनावणी १७ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

## तंत्रज्ञान, उत्पादन आणि सेवा उद्योग क्षेत्रासाठी वाकायामा प्रांताशी सहकार्य अधिक दृढ करणार – मुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र आणि जपानच्या वाकायामा प्रांतामधील संबंध मैत्रीपूर्ण आहेत. तंत्रज्ञान, उत्पादन आणि सेवा उद्योग क्षेत्रात सहकार्य अधिक वाढवून हे संबंध येणाऱ्या काळात अधिक दृढ करण्यात येतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. जपानसोबतचे आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध अधिक मजबूत करण्याचा मानस त्यांनी यावेळी व्यक्त केला.

जपानच्या वाकायामा प्रांताचे राज्यपाल मियाझाकी इजुमी यांनी जपानच्या शिष्टमंडळासह हॉटेल ताजमहल येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, जपानचे मुंबईतील महावाणिज्यदूत यागी कोजी, वाकायामा विधानसभेचे उपाध्यक्ष अकिझुकी फुमिनारी यांच्यासह जपानचे शासन, विधिमंडळ, सांस्कृतिक, क्रीडा, उद्योग आदी विविध क्षेत्रातील प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबई ही भारताची आर्थिक, व्यावसायिक, सांस्कृतिक आणि मनोरंजन व्यवसायाची राजधानी आहे. 'सिस्टर स्टेट' असलेल्या महाराष्ट्राचे आणि वाकायामा प्रांताचे अनेक वर्षांपासून मैत्रीचे संबंध आहेत. महाराष्ट्र आणि वाकायामा प्रांतादरम्यान २०१३ मध्ये सहकार्याचा सामंजस्य करार झाला होता आणि २०२३ मध्ये त्याचे नूतनीकरण करण्यात आले. या कालावधीत दोन्ही राज्यांमध्ये सांस्कृतिक, क्रीडा, पर्यटन आणि शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय देवाणघेवाण झाली आहे. वाकायामा प्रांताच्या सहकार्याने जपानी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले असून अजिंठा परिसरातही जपानी पर्यटकांसाठी सुविधा उभारण्यात आल्या आहेत.

दोन वेळा झालेल्या जपान दौऱ्यादरम्यान वाकायामा आणि कोयासन येथे भेट दिल्याच्या आठवणी सांगून कोयासन विद्यापीठात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले, हे दोन्ही देशांतील मैत्रीचे प्रतीक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. २०२३ मध्ये वाकायामाचे दिवंगत राज्यपाल यांच्या उपस्थितीत सुमो पहेलवानांचा संघ मुंबईत आला होता. गेटवे ऑफ इंडिया परिसरात सुमो आणि भारतीय कुस्तीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले, ज्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभल्याची आठवण त्यांनी सांगितली. सध्या जपानचे सुमो पहेलवान पुण्यातील बालेवाडी क्रीडा संकुलात प्रशिक्षण घेत आहेत. या क्रीडा क्षेत्रातील देवाणघेवाणीमुळे दोन्ही देशांना उत्कृष्ट खेळाडू घडविण्यास मदत होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

जपानचे दिवंगत पंतप्रधान शिंजो आबे यांची आठवण करीत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, त्यांनी भारताशी मैत्री अधिक दृढ केली. त्यांच्या कार्यकाळात मुंबई–अहमदाबाद बुलेट ट्रेनसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू झाले. मुंबईत ४० कि.मी. लांबीची भूमिगत मेट्रो, २२ कि.मी. लांबीचा देशातील सर्वात मोठा समुद्री पूल उभारण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

अफगाणिस्तानातील बामियानच्या गौतम बुद्धांच्या पुतळ्याच्या विध्वंसाला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर नागपूर येथे त्या पुतळ्याची प्रतिकृती उभारण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यपालांना दिला. नागपूर शहर डॉ.आंबेडकर यांनी बौद्ध धर्म स्वीकारून पुनरुज्जीवन घडवून आणलेले ऐतिहासिक ठिकाण आहे.

## कॉपीमुक्त अभियानासाठी ठोस पावले उचला

**विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांचे अधिकाऱ्यांना निर्देश**



**छत्रपती संभाजीनगर** – छत्रपती संभाजीनगर विभागातील काही परीक्षा केंद्रांवर घडलेल्या गैरप्रकारांच्या बातम्या राज्यात पोहोचल्या असून, यामुळे विभागाच्या प्रतिमेला धक्का बसला आहे. त्यामुळे यापुढे अशा घटना घडू नयेत, यासाठी सर्व यंत्रणांनी अधिक जबाबदारीने काम करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले.

दहावी व बारावी परीक्षांच्या पार्श्वभूमीवर विभागातील पोलीस उपमहानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर, नांदेड जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प., पोलीस अधिक्षक, विभागीय शिक्षण उपसंचालक, एसएससी बोर्डाचे अध्यक्ष व सचिव, तसेच शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांच्यासमवेत विभागीय आयुक्त श्री. पापळकर यांनी आढावा बैठक घेतली. बैठकीत काही केंद्रांवर कॉपी व गैरप्रकार झाल्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या घटनांमुळे वृत्तपत्रांमध्ये नकारात्मक बातम्या प्रसिद्ध झाल्याने विभागाच्या कामकाजात सुधारणा करण्याची गरज असल्याचे आयुक्तांनी नमूद केले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अंतर्गत होणाऱ्या परीक्षांमध्ये पारदर्शकता राखण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नियंत्रण कक्ष, भरारी पथके व निरीक्षण व्यवस्था अधिक मजबूत करण्याचे निर्देश आयुक्त पापळकर यांनी दिले. बैठकीत सांगण्यात आले की, बीड जिल्ह्यात १०३ परीक्षा केंद्रांसाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष व १०३ पथके कार्यरत करण्यात आली आहेत. तसेच सर्व केंद्रांवर नियमित तपासणी केली जात आहे. छत्रपती संभाजीनगर व बीड येथील काही शिक्षकांवर निलंबनाची कारवाई प्रस्तावित करण्यात आली असून, संबंधित संस्थेच्या दोषी शिक्षकांविरुद्ध निलंबनाची कारवाई करण्याबाबत कळविले असल्याचे संबंधित शिक्षणाधिकारी यांनी बैठकीत सांगितले.

यापुढे कोणत्याही केंद्रावर गैरप्रकार झाल्यास संबंधित संस्थेतील दोषींविरुद्धही गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा देण्यात आला. केवळ शिक्षकांवरच नव्हे, तर सर्व संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, असे आयुक्तांनी सांगितले. कॉपीमुक्त अभियानासाठी करत असलेल्या कार्यवाहीची माहिती जिल्हाधिकारी, नांदेड, लातूर, परभणी, जालना यांनी बैठकी दरम्यान दिली.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष नंदकुमार बेडसे यांनी परीक्षा या कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याची अपेक्षा व्यक्त केली. संवेदनशील परीक्षा केंद्रावर बैठेपथक नियुक्त करुन त्यांचा नियमित आढावा घेण्याचे निर्देश देण्यात आले. पोलीस प्रशासनाने गैरप्रकार घडलेल्या ठिकाणी गुन्हे दाखल करण्याबाबत त्वरेने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

## बोली भाषा ही आपल्या शब्दकळेतून नाद, लय आणि रंगातून संवाद साधते – प्राचार्य डॉ. वसंत बिरादार




**अहमदपूर (प्रतिनिधी)** – मराठी ही मृत्युपंथाला लागणारी भाषा नाही, तर ती दिवसेंदिवस समृद्ध होत चालली आहे. जोपर्यंत ग्रामीण भ संस्कृतीतला माणूस जिवंत आहे, तोपर्यंत या भाषेला मूल्य राहणार आहे. आज बोली शब्दकळांमधून नाद, लय, गोडवा आणि विविध रंगातून संवाद साधते ती भाषा जीवापाड जपण्याचे कार्य ग्रामीण भागातून होत आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध लेखक, समीक्षक तथा ज्येष्ठ कादंबरीकार प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी केले.

येथील महात्मा फुले महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मराठी भाषा संवर्धन पंधरवडा समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील बोलत होते. यावेळी किसानपीठावर आयक्युएसी समन्वयक तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख उपप्राचार्य डॉ. दुर्गादास चौधरी, हिंदी विभागाचे प्राध्यापक तथा ज्येष्ठ अनुवादक, भाषा तज्ज्ञ डॉ. पांडुरंग चिलगर, संयोजक ह.भ.प. डॉ. अनिल मुंढे, डॉ. मारोती कसाब हे उपस्थित होते.

याप्रसंगी पुढे बोलताना प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील म्हणाले की, मराठीला बोलीभाषेची समृद्ध परंपरा आहे. माळवं, मंडई, फिंड्री,कवर यासह म्हणी व वाक्प्रचारांचा उहापोह केला. आजही ग्रामीण भागात मराठी अभिमानाने बोलली जाते. मराठी लोक व्यवहारा बरोबरच ज्ञान व्यवहाराचीही भाषा झाली असून साहित्य वाचनाने जीवनात आनंदाची निर्मिती करणारी भाषा आहे असेही ते म्हणाले. यावेळी बोलताना उपप्राचार्य डॉ. दुर्गादास चौधरी म्हणाले की मराठीला अभिजात भाषेचा योग्य दर्जा लाभलेला आहे. मात्र तिला जागतिक महत्त्व येण्यासाठी बाजार मूल्य प्राप्त झाले पाहिजे. विद्यार्थ्यांनी सातत्याने मराठी भाषेचा अभ्यास करावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## तांड्यापासून अंतराळापर्यंत : ग्रामीण विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना शासनाची साथ – इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे

**मुंबई (प्रतिनिधी)** – इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विज्ञान प्रेरणा अभियान अंतर्गत विजाभज आश्रमशाळांमधील १०० गुणवंत विद्यार्थ्यांना भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) येथे विशेष शैक्षणिक विज्ञान सहलीचे १५ ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजन करण्यात आल्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

मंत्री सावे म्हणाले, ग्रामीण व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाविषयी जिज्ञासा, संशोधनाची वृत्ती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक आहे. आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात अंतराळ संशोधन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध असून त्या संधीं ग्रामीण विद्यार्थ्यांना प्राप्त होण्यासाठी शासनाने विशेष उपक्रम हाती घेतला.

मंत्री सावे म्हणाले, राज्यातील विविध 'विजाभज' आश्रमशाळांमधून गुणवत्ता परीक्षेद्वारे १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांना इस्रो येथे भेट देऊन उपग्रह निर्मिती, प्रक्षेपण तंत्रज्ञान, प्रत्यक्ष रॉकेटचे प्रक्षेपण पाहणे आणि अंतराळ संशोधन प्रकल्पांविषयी प्रत्यक्ष माहिती घेण्याची संधी मिळणार आहे. तसेच विज्ञानविषयक कार्यशाळा आणि शास्त्रज्ञांशी, तज्ज्ञांशी संवादाच्या माध्यमातून त्यांना अनुभवाधारित शिक्षणाचा लाभ होणार आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील वैज्ञानिक संस्थांशी जोडणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि उच्च शिक्षणाच्या संधींबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांचा प्रवास विमानाने होणार असून त्यांच्या सुरक्षित व सुसूत्र प्रवासाची विशेष काळजी घेण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांसाठी उत्कृष्ट दर्जाची निवास व्यवस्था करण्यात आली असून दररोज आवश्यक सर्व सुविधा व साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती विभागामार्फत देण्यात आली आहे. असा उपक्रम विभागामार्फत पहिल्यांदाच राबविण्यात येत आहे.

## 'हिंद–दी–चादर' कार्यक्रमात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी व्हावे –चरणजितसिंग साहनी

**पुणे (प्रतिनिधी)** – श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्यावतीने २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी खारघर, नवी मुंबई येथे भव्य 'हिंद–दी–चादर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे; या कार्यक्रमाचा सर्व समाजातील नागरिकांनी सहभागी होवून संगतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन 'हिंद–दी–चादर' कार्यक्रमाचे राज्यस्तरीय समन्वय समिती अशासकीय सदस्य तथा कॅम्प येथील गुरुद्वारा गुरुनानक दरबारचे अध्यक्ष चरणजितसिंग साहनी यांनी केले.

श्री. साहनी म्हणाले, गुरु तेग बहादुर साहिब जी यांची शहीदी संपूर्ण मानवजातीच्या धार्मिक स्वातंत्र्यासाठी आणि सत्यासाठी होते. या पवित्र प्रसंगी, सिख, सिकलीगर, लबाना, बंजारा, मोहयाल, सिंधी आणि गुरुनानक नाम लेवा संगत–समुदाय एकत्रितपणे हा शहीदी समागम साजरा करीत आहेत. या सर्व समुदायांचे गुरु साहिबांशी ऐतिहासिक संबंध आहेत, ज्यांनी शतकानुशतके एकता, धैर्य आणि मानवतेचा संदेश दिला. गुरु साहिबांच्या शिकवणी आणि त्यांचे हौतात्म्यची भावना भावी पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न आहे.

श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त यापूर्वी नागपूर आणि नांदेड येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, या कार्यक्रमास लाखो नागरिक सहभागी झाले होते. खारघर, खारघर, नवी मुंबई येथे होणाऱ्या कार्यक्रमात नागरिकांना सोई–सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता प्रशासनाच्यावतीने जय्यत तयारी करण्यात येत आहे.


### जाहीर प्रगटन

मौजे फतेजंगपूर ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील शेत गट नं. ३७ आणि ३८ मधील जयप्रकाश कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. फतेजंगपूर ता.जि.नांदेड मधील पैकी एक प्लॉट नं. १५ ब ज्याचे एकूण क्षेत्रफळ ८५० चौ.फुटाचा प्लॉट लक्ष्मीबाई बालाजी यन्नावार रा. पंकजनगर, धनेगाव ता.जि. नांदेड यांचेकडून वच्छेवार संजय नागनाथराव रा. श्रीपाद नगर, जुना कौठा नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतुःसिमा– पूर्वेस – प्लॉट नं. १६, पश्चिमेस – ०६ मीटर रूंद रस्ता, दक्षिणेस – प्लॉट नं. १५ अ व उत्तरेस – ओपन प्लॉट आहे.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनगर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**वच्छेवार संजय नागनाथराव**
**रा. श्रीपाद नगर, जुना कौठा नांदेड**



जा.क्रं.नांवाशमनपा/क्षे.का.01/नापवि/3518 /2026
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
दिनांक:- 12-2-2026

जाहीर प्रगटन

संचिका क्रं.326/40/2025-2026/क्षे.का.क्रं.1 तरोडा-सांगवी

प्रकरण:- नाव परिवर्तन करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाच्या अधारे सर्व जनतेस कळविण्यात येते श्री/सौ विशाल श्याम पिंपळे रा.खु. नांदेड शहर या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, ता.नि.भु.अ. पत्र क्रं. 1051/09 दि.30/10/2009 नांदेड शहर गट नं.215 पैकी प्लॉट नं.03 वरील राज पर्ल सदनिका नं.204 मनपा पिन.40112040020 श्री/सौ. श्याम मारोतराव पिंपळे यांच्या नावे असलेली मालमता यांचेकडुन अर्ज बक्षिस पत्र क्रं.2-9820-2025 दि.14/11/2025 च्या आधारे विकत घेतली आहे / वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी श्री/सौ. विशाल श्याम पिंपळे त्यांचे नांवे कर आ-कारणी नोंद वहीत घेण्यासाठी जाहिरप्रगटन देण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून (15) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. अन्यथा अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नांवे वरील प्रमाणे मालमता नोंदविण्यात येईल.

चतु:सिमा :- व इतर
पुर्व :- सदनिका नं.203 आहे.
पश्चिम :- सदनिका नं.205 आहे.
दक्षीण :- अपार्टमेंट मधील मोकळी जागा आहे.
उत्तर :- कॉमन पॅसेज व स्टेअरकेस आहे.

सहाय्यक आयुक्त
क्षे.का.क्रं.01 तरोडा सांगवी,
नांदेड वाघाळा शहर महानरलिका,नांदेड



## Change In Name

My Old Name is SHEIKH IRSHAD S MAHEBUB which now I am changing as New Name SHAIKH IRSHAD SHAIKH MAHEBUB Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address - Mu, Pingli Post. Pingli Dist. Parbhani 431402



### जाहीर प्रगटन

मौजे वाडी (बु.) ता.जि. नांदेड ग्राम पंचायत हद्दीतील शेत सर्व्हे नं. ३३ मधील पैकी प्लॉट नं. ३५ ज्याचे एकूण क्षेत्रफळ १६४७ चौ.फुटाचा प्लॉट गणेश कामाजी दाढे रा. वाडी (बु.) ता.जि. नांदेड यांचेकडून गोविंद यशवंत थोरात रा. भोकर जि.नांदेड व आरती प्रविण गच्चे रा. दुधगंगा हौसिंग सोसायटी, सैदापूर सातारा यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतुःसिमा– पूर्वेस – प्लॉट नं. ३६, पश्चिमेस – प्लॉट नं. ३४, दक्षिणेस – २० फूट रूंद रोड व उत्तरेस – सर्व्हे नं. ३३.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनगर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**गोविंद यशवंत थोरात**
**रा. भोकर जि.नांदेड मो.नं. ९७६७७२३५९**
**आरती प्रविण गच्चे रा. दुधगंगा हौसिंग सोसायटी, सैदापूर सातारा**



### जाहीर प्रगटन

मौजे वाडी (बु.) ता.जि. नांदेड ग्राम पंचायत हद्दीतील शेत सर्व्हे नं. ३३ मधील पैकी प्लॉट नं. ३६ ज्याचे एकूण क्षेत्रफळ १४१० चौ.फुटाचा प्लॉट गणेश कामाजी दाढे रा. वाडी (बु.) ता.जि. नांदेड यांचेकडून ज्योती भिमराव बुक्तरे रा. नवजीवननगर, नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतुःसिमा– पूर्वेस – प्लॉट नं. ३७, पश्चिमेस – प्लॉट नं. ३५, दक्षिणेस – २० फूट रूंद रोड व उत्तरेस – सर्व्हे नं. ३३.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनगर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**ज्योती भिमराव बुक्तरे**
**रा. नवजीवननगर, नांदेड**
**मो. ७९७२००६१७९**



जाहिर प्रगटन
बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३५/ २०२६ | पुढील तारीख – १६.०३.२०२६

अर्जदार : गोपालसिंग पि. गंगारामसिंग ठाकुर
वय ४९ वर्षे, व्यवसाय – शेती, रा. सगरोळी ता. बिलोली जि. नांदेड.
विरुध्द
गैरअर्जदार: गणपतसिंग पि.हानुमानसिंग ठाकुर
वय ६५ वर्षे, व्यवसाय – शेती, रा. सगरोळी ता. बिलोली जि. नांदेड.

विषय– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार हा मयत हानुमानसिंग लछमनसिंग ठाकुर यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार हा मयत हानुमानसिंग लछमनसिंग ठाकुर यांचा नातु असुन गैरअर्जदार हा मयत हानुमानसिंग लछमनसिंग ठाकुर यांचा मुलगा आहे. मयत हानुमानसिंग लछमनसिंग ठाकुर यांचा मृत्यू दिनांक १५.११.१९९१ रोजी झाला. अर्जदार यांनी कथन केले आहे की, अर्जदार यांना मयत हानुमानसिंग लछमनसिंग ठाकुर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात सदर मयत यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे सदर मयत यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर सदर मयत यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे सदर मयत यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू सदर मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०५/०२/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

क. लिपीक
दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली

आदेशावरून
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली



## पाहिजे

कुशल आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन/मोटार वाईंडींग अनुभव व तसेच आय.टी.आय. टर्नर ट्रेड अनुभव किमान ५ वर्षे असावा. कमीत कमी वेतन १५,०००/- रू. इच्छुकांनी खालील पत्यावर संपर्क करावा.

**-: संपर्क पत्ता :-**
**उषा इलेक्ट्रीकल वर्क्स,**
**सिडको एम.आय.डी.सी. नांदेड**
**मो.नं. ९९६०१२८१९१**



## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेंडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## निर्मितीमूल्य शिक्षण संस्थांचे राष्ट्र उभारणीत मोलाचे योगदान -डॉ. माधवराव किन्हाळकर

### गजानन विद्यालयात गुणवंतांचा सत्कार



**देगलूर (प्रतिनिधी)** –सध्याच्या काळात वरवरचे शिक्षण देण्याच्या पद्धती रुढ होत असून, ते येणाऱ्या काळासाठी चिंताजनक आहे. शिक्षणातून समाजाला निर्मितीमूल्य देता आले पाहिजे. विवेकशील, संस्कारित, शिस्तप्रिय शिक्षकच आदर्श नागरिक घडवतात. यासाठी खोलवर रुजवणारे शिक्षण देणाऱ्या संस्थाचा वाटा राष्ट्र उभारणीत मोलाचे योगदान देऊ शकतात, असे प्रतिपादन माजी गृहराज्यमंत्री डॉ. माधवराव किन्हाळकर यांनी केले.

तडखेल येथील गजानन माध्यमिक विद्यालयात माजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ बुधवार दि. ११ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आला होता. यावेळी विविध क्षेत्रात कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या विद्यालयातील ५० माजी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रसिद्ध साहित्यिका डॉ. वृषालीताई किन्हाळकर, माजी शिक्षण सभापती व्यंकटराव पाटील गोजेगावकर, माजी सभापती शिवाजीराव देशमुख बळेगावकर, दै. गोदातीर समाचारचे संपादक केशव घोणसे पाटील, प्रल्हादराव उमाटे, गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे, विवेक पाटील, पत्रकार अनिल कदम, सरपंच कठारे, संस्थेचे अध्यक्ष बालाजीराव इंगळे यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती. गुणवत्तेवर आधारित शिक्षण दिले गेले तरच समाजाला त्याचा फायदा होईल. स्वतःच्या उन्नतीपेक्षा इतरांना काय देता आले पाहिजे, हे जोपर्यंत राज्यकर्त्यात रुजणार नाही तोपर्यंत समाजाचा सर्वांगीण विकास अशक्य असल्याचे सांगून डॉ. किन्हाळकर यांनी माझ्या पालकमंत्री पदाच्या काळात शिक्षणाबाबतीत नांदेड जिल्हा राज्यात खालून दुसऱ्या स्थानावर होता. बृहत आराखडा तयार करून जिथे शिक्षण पोहोचले नव्हते अशा दुर्गम भागात ११० शाळांना मान्यता देण्याचे काम त्या काळात केले गेले. त्यातून गजानन ही शाळा उभी राहिली. आज येथील विद्यार्थी विविध क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटवीत असलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्काराला उपस्थित राहता आले ही समाधानाची बाब असल्याचे ते म्हणाले.

यावेळी माजी शिक्षण सभापती व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांनी पारंपरिक शिक्षणापेक्षा नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणारे शिक्षण देण्यासाठी आता समूहाने पुढे येण्याची गरज असल्याचे सांगितले. साहित्यिका डॉ. वृषालीताई किन्हाळकर यांनी इंग्रजी ही एक भाषा असून, तिचा बाऊ न करता विद्यार्थ्यांनी सकस, सहज, सरस या त्रिसूत्रीचा वापर करून ज्ञान आत्मसात करावे. शिक्षणातून उत्तम माणूस बणून आपले उचित ध्येय गाठण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. ग्रामीण भागात शिक्षण कसदार आहे. पण पायाभूत सुविधा नाहीत, म्हणून पालकांचा मराठी शाळांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी त्यांच्यात जनजागृती करण्यासाठी शासन स्तरावरच रचनात्मक बदल होण्याची अपेक्षा माजी सभापती शिवाजीराव देशमुख बळेगावकर यांनी व्यक्त केली. संपादक केशव घोणसे पाटील यांनी गजानन विद्यालयाच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर होताना संस्थेने राबवलेल्या उपक्रमांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. प्रास्ताविकात संस्थेचे अध्यक्ष बालाजीराव इंगळे यांनी विद्यालयाने गुणवंत विद्यार्थ्यांसाठी राबवलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तर सचिव राजेश्वर अटकळे यांनी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी तांत्रिक शिक्षणाची या भागात गरज असल्याचे सांगितले.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दाचावार यांनी केले तर उपस्थितांचे आभार नागनाथ सुकाळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक संजय अटकळे, एकताच्या मुख्याध्यापिका प्रियाताई इंगळे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## स्काऊट गाईडमधून शिस्त, स्वावलंबन व सहकार्य हे जीवनमूल्ये मिळते -आ. प्रतापराव पाटील चिखलीकर



❍ लोहा – पारडीच्या 'सह्याद्री शाळेत जिल्हास्तरीय ५१ व्या स्काऊड गाईड मेळाव्याचे शानदार उद्घाटन ❍ ५१ शाळा –६० तंबू जवळपास दीड हजार विद्यार्थी ९ ❍ मेळाव्यच्या निधीसाठी प्रयत्न करू ❍ ढोल ताशाचा निनाद – उत्कृष्ट ❍ संचलन अप्रतिम स्वागत गीत

**लोहा (प्रतिनिधी)** – स्काउट-गाईडमधून विद्यार्थ्यांना शिस्त, स्वावलंबन, सहकार्य या जीवनमूल्यांची शिकवण मिळते, असे प्रतिपादन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले.

लोहा – पारडी येथील सह्याद्री प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या मैदानावर ५१ या जिल्हास्तरीय स्काउट गाईड मेळाव्याचे उद्घाटन प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी रोजी पार पडले. यावेळी आ. चिखलीकर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोह्याचे नगराध्यक्ष शरद पाटील पवार यांची उपस्थिती होती.

यावेळी व्यासपीठावर शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, शिक्षणाधिकारी (मा) माधव सलगर, रा.कॉं. चे प्रदेश सचिव ॲड. मुक्तेश्वर धोंडगे, युवानेने प्रवीण पाटील चिखलीकर, गटविकास अधिकारी महेंद्र कुलकर्णी, नायब तहसीलदार डॉ. हाडगे, शिक्षणाधिकारी (योजना) दिलीप बनसोडे, शा.पो.पु. अधीक्षक पाचगे, उपशिक्षणाधिकारी गंगाधर राठोड, उपनगराध्यक्ष करीम शेख, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, भास्कर पवार, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, तालुका कृषी अधिकारी कासराळीकर, स्काउट गाईडचे संघटक इरले, गटशिक्षणाधिकारी सतीश व्यवहारे, स्काऊट गाईड मेळाव्यासाठी जिल्हा संघटक जनार्दन ईरले, जिल्हा गाईड संघटक माधुरी जवने, मेळावा प्रमुख सतीशकुमार वाकोडे व कबबुलबुल मेळावा प्रमुख बालाजी तोरणेकर, स्काऊट गाईड प्रशिक्षण आयुक्त भागिरथी बच्चेवार, फुलारी, शिक्षण विस्तार अधिकारी आंबटवाड, श्रीमती कापसे, प्राचार्य दिलीप बोधगिरे, दामोधर वडजे, विठ्ठल चव्हाण, पी. डी. पोले, फाजगे व लोह्याचे नगरसेवक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. प्रतापराव पाटील यांच्या हस्ते जिल्हास्तरीय मेळाव्याचे उद्घाटन झाले. याप्रसंगी बोलताना त्यांनी शालेय जीवनातील स्काउट-गाईडच्या आठवणी सांगितल्या. शिस्त, स्वावलंबन व सहकार्य हे जीवनमूल्ये यातून मिळते. मेळाव्यासाठी निधी वाढून मिळावा यासाठी जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना बोलू, असे सांगून स्वागत गीत, विद्यार्थी संचलन, ढोल वाद्य तसेच सह्याद्री शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्य व स्वागत गीत याचे त्यांनी कौतुक केले.

## नांदेड जिल्ह्यातील १० विद्यार्थ्यांची 'इस्त्रो' अभ्यास दौऱ्यासाठी निवड

**नांदेड (प्रतिनिधी)** – इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या खाजगी अनुदानित विजाभज आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो) येथे अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला आहे. हा दौरा बेंगलुरु, तिरुवनंतपुरम आणि कन्याकुमारी येथे १५ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पार पडणार आहे.

राज्यभरातून परीक्षेद्वारे एकूण १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून, त्यामध्ये नांदेड जिल्ह्यातील ३ आश्रम शाळांमधील १० विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. नांदेड जिल्ह्यातील आश्रम शाळांमधील विमुक्त जाती व भटक्या जमातीतील हे विद्यार्थी या शैक्षणिक दौऱ्यासाठी रवाना होणार असल्याची माहिती इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक सचिन खुणे यांनी दिली. स्व. संगीता देवी उच्च माध्यमिक आश्रमशाळा, दहेली तांडा ता. किनवट कु. संजीवनी शिवाजी चव्हाण, म. फुले मा. व. उच्च माध्यमिक आश्रमशाळा, वाघाळा ता. नांदेड चि. जाधव अमेय प्रेम, चि. हेळगिरे दत्ता बालाजी, विद्यानिकेतन (पब्लिक स्कूल), कमळेवाडी ता. मुखेड जि. नांदेड चि. आयुष अशोक पोफाळे, चि. करण राम किशन चौगुले, कु. कालेकर आश्विनी निवृत्ती, निकिता धोंडीबा केंद्रे, कु. दुर्गा दत्ता खांडरे, कु. दीक्षा जीवन चव्हाण, चि. राहुल संभाजी शिरसाट.

इस्त्रोसारख्या राष्ट्रीय दर्जाच्या अंतराळ संशोधन संस्थेला भेट देण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या यशाबद्दल विद्यार्थ्यांवर विविध स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत असून, ही बाब नांदेड जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरत आहे.

## प्रेमीयुगुलांना लुटणाऱ्या दोन चोरट्यांना अटक; 'एलसीबी'ची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)**– शहर आणि जिल्ह्यात जबरी चोरी करणारी टोळी सक्रिय झाल्याने या टोळीला पकडण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करीत दोन चोरट्यांना अटक केली आहे. या चोरट्यांकडून ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून नांदेड ग्रामीण पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. ही कारवाई १२ फेब्रुवारी रोजी सायंकाळच्या सुमारास करण्यात आली.

नांदेड शहर आणि जिल्ह्यात जबरी चोरी करणाऱ्या चोरट्यांनी आपले डोके वर काढल्याने पोलिसांसमोरही एक आव्हान उभे राहिले होते. विशेष करून हे चोरटे प्रेमी युगुलांना गाठून त्यांना धमकी देऊन लुटत असत. पोलीस निरीक्षक उदय खंडेरायांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे, पोलीस उपनिरीक्षक बळीराम दासरे, एएसआय गुंडेराव कर्ले, हवालदार देवा चव्हाण, दिलीप चंचलवार, अंमलदार मोतीराम पवार आणि सिद्धार्थ सोनसळे हे नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत जबरी चोरी करणाऱ्या चोरट्यांना पकडण्यासाठी गस्तीवर होते. त्यांना मिळालेल्या माहितीवरून ग्रामीण तंत्रनिकेतन कॉलेजकडून विष्णुपुरी पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनच्या बाजूस चोरीचे दागिने आणि मोबाईल विक्री करण्यासाठी चोरटे येणार असल्याचे समजले. यावरून त्यांनी सापळा लावून शेख सोहेल शेख वसीम (वय १९ रा. जामा मस्जिद जवळ वाजेगाव नांदेड) आणि विशाल उर्फ पप्पू माधवराव हंबर्डे (वय २४ रा. विष्णुपुरी नांदेड) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी केली असता त्यांच्याकडून तीन ग्रॅम सोन्याचे दागिने आणि ओपो कंपनीचा मोबाईल असा ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत त्यांनी दोन जबरी चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. या दोन्ही चोरट्यांना जप्त मुद्देमालासह नांदेड ग्रामीण पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

## डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेत भार्गव करिअर अकॅडमीचे यश

### २७ विद्यार्थी मुंबई येथील तिसऱ्या व चौथ्या फेरीसाठी पात्र




**नांदेड (प्रतिनिधी)** – डॉ. होमीभाभा बाल वैज्ञानिक परीक्षा २०२५-२६ च्या दुसऱ्या फेरीचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये भार्गव करियर अकॅडमीच्या इयत्ता सहावीतील विद्यार्थ्यांनी गगनभरारी घेतली आहे. २७ विद्यार्थी मुंबई येथे होणाऱ्या तिसऱ्या व चौथ्या फेरीसाठी पात्र ठरले आहेत.

मुंबई विज्ञान शिक्षक परिषदे-मार्फत दरवर्षी इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. होमीभाभा बाल वैज्ञानिक परीक्षा लेखी, प्रात्यक्षिक, संशोधन प्रकल्प व मुलाखत अशा चार स्तरावर घेण्यात येते. विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाची गोडी लागावी त्यांच्यात याविषयी आवड निर्माण व्हावी जेणेकरून यातूनच हुशार शाखज देशाला मिळावे या हेतूने ही परीक्षा घेतली जाते.

डिसेंबर २०२५ मध्ये डॉ. होमीभाभा बालवैज्ञानिक परीक्षेचा पहिल्या फेरीचा निकाल जाहीर झाला. यामध्ये १७१ विद्यार्थी दुसऱ्या (प्रात्यक्षिक) फेरीसाठी पात्र ठरले होते. तसेच दुसऱ्या फेरीचा निकाल नुकताच नाहीर झाला ज्यात तब्बल २७ विद्यार्थी हे मुंबई येथे होणाऱ्या संशोधन प्रकल्प व त्यावरील मुलाखत अशा तिसऱ्या व चौथ्या फेरीसाठी पात्र ठरले आहेत. यामध्ये आर्यन चंद्रकांत देवसरकर, आरवकुमार संजय सुंदाळे, अद्वैत गजानन नळंदवार, अद्विका नितीन नरवाडे, अक्षित सुधाकर तहाडे, अन्वय धनराज चव्हाण, आराध्या सुधाकर जायभाये, आराध्या साईनाथ नरावाड, अर्णव संदीप ठाकूर, अवनी शंकर इंदूरकर, आयुष सुरेश राजेवार, आयुष विवेकानंद सूर्यवंशी, गणेश रामराव मळगे, कृष्णा विश्वनाथ येडे, मैथिली माधव भोपळे, मिहिका बालाजी संदुपटलवार, ओजस गजानन लुटे, सहेर युनूस कुरेशी, सान्दो कैलास पवार, श्लोक सुकेश आलापुरे, श्रेया संदीप शिंदे, श्रेयस अमोल देशमुख, श्रीजा संतोष इमडे, श्रीनिधी कैलास कर्णवार, शौर्य किशोर देशमुख, वेदिका विठ्ठल शेळके, युवराज शिवराज वडजे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे भार्गव करिअर अकॅडमीचे संचालक भार्गव यांनी कौतुक केले असून, पुढील संशोधन प्रकल्प आणि मुलाखत फेरीसाठी दिशानिर्देश देत शुभेच्छा दिल्या आहेत.

## लक्ष्मण कांबळे यांचे निधन



**रामतीर्थ (प्रतिनिधी)** – बिलोली येथील आंबेडकरवादी विचारांचे लक्ष्मण मोतीराम कांबळे यांचे अल्पशा आजाराने दि. १३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सातच्या सुमारास वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवार, दि. १४ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता रामतीर्थ येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

लक्ष्मण कांबळे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन मुली, नातू नाती असा परिवार असून, ते वंचित बहुजन आघाडी बिलोली तालुका कोषाध्यक्ष गंगाधर कांबळे यांचे वडील तर महेश कांबळे यांचे आजोबा होत.

## नांदेड दक्षिण कॉँग्रेस कमिटीची उद्या बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)** – खा. रवींद्र वसंतराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत व माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्या अध्यक्षतेखाली नांदेड दक्षिण कॉँग्रेसची बैठक होत आहे. रविवार, दि. १५ फेब्रुवारी, रोजी दुपारी १ वा. वसंतस्मृती मेमोरीयल कृषी महाविद्यालय प्रागंण नायगांव (बा.) येथे ही बैठक आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीत ब्लॉक/तालुका स्तरावर संघटन मजबूत करणे, बुथनिहाय समितीचे नियोजन करणे, आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीबाबत पूर्वतयारी सुंदर्भात चर्चा करणे, नॅशनल टॅलेंट हंट बाबत चर्चा व जिल्हा व तालुका स्तरीय कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांचे नियुक्तीपत्र वाटप करण्यात येणार आहेत. या बैठकीला उपस्थित रहावे, असे आवाहन कार्यालयीन सचिव दत्ता येवते यांनी केले आहे.

## कुरुंदकर व्याख्यानमालेत साहित्यिक डॉ. आसाराम लोमटे यांचे व्याख्यान



**नांदेड (प्रतिनिधी)** –नरहर कुरुंदकर प्रतिष्ठान व रूपवेध ग्रंथालय यांच्या वतीने होणाऱ्या 'नरहर कुरुंदकर व्याख्यानमालेचे' हे ४४ वे वर्ष असून, यावर्षी साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक आणि सुप्रसिध्द पत्रकार डॉ. आसाराम लोमटे यांची व्याख्याने दि. २३ व २४ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार आहेत.

डॉ. आसाराम लोमटे हे परभणी येथे पूर्णवेळ पत्रकार व कथा-कादंबरीकार तसेच वैचारिक लेखक आहेत. 'इडा पिडा टळो','आलोक' व 'वाळसरा' हे त्यांचे कथासंग्रह असून, 'तसनस' ही कादंबरी व 'धूळपेर' हा लेखसंग्रह प्रकाशित आहे. त्यांच्या कलाकृतींना महाराष्ट्रातील विविध मान्यवर संस्थांचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. २०१६ साली 'आलोक' कथासंग्रहासाठी त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला आहे. विविध वृत्तपत्रे व नियतकालिकांतून कृषीजीवनाबद्दल व इतर अनेक प्रश्नांबद्दल ते सातत्याने लिहीत असतात.

डॉ. लोमटे सोमवार, दि. २३ फेब्रुवारी रोजी 'समाज, साहित्य आणि संवेदनशीलता' या विषयावर तर दि. २४ फेब्रुवारी रोजी 'भारतीय साहित्य व साहित्यातील भारतीयता' या विषयावर बोलतील. सायन्स कॉलेजच्या पुरणमल लाहोटी सभागृहात दररोज सायं. ६ वाजता होणाऱ्या या व्याख्यानांचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रा. सौ. श्यामल पत्की यांनी केले आहे.

## किनवट अपर जिल्हाधिकारी कार्यालयासह जिल्ह्यात चार अपर तहसील कार्यालयांची निर्मिती

### खा. अशोकराव चव्हाण यांनी केले स्वागत

**नांदेड (प्रतिनिधी)** –राज्य सरकारने नांदेड जिल्ह्यात किनवट येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय तर नांदेड, तामसा, मुक्रमाबाद व इस्लापूर या चार ठिकाणी अपर तहसील कार्यालयाची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला आहे. माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यभरात ११ अपर जिल्हाधिकारी कार्यालय तर ६९ अपर तहसील कार्यालयांची निर्मिती करण्याच्या निर्णयावर मोहर लावण्यात आली. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील किनवट येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय तर नांदेड (ता. नांदेड), तामसा (ता. हदगाव), मुक्रमाबाद (ता. मुखेड) व इस्लापूर (ता. किनवट) येथे अपर तहसील कार्यालयाचाही समावेश आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणेला बळकटी मिळणार असून, नागरिकांची कामे सुलभ होणार आहेत. या निर्णयाबद्दल खा. अशोकराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व पालकमंत्री अतुल सावे यांचे आभार मानले आहेत.

## पुलवामा हल्ल्यातील शहिसांसाठी नांदेड येथे श्रद्धांजली सभेचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** – पॅरामिलिटरी संघटनेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पुलवामा हल्ल्यातील शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शनिवार दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

पुलवामा हल्ल्यात भारताचे ४० जवान १४ फेब्रुवारी २०१९ रोजी शहीद झाले होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने सकाळी ठिक १०:१५ वाजता शहीद स्मारक, तिरंगा चौक (VIP रोड) येथून महात्मा फुले स्मारक, आय. टी.आय. पर्यंत मोटारसायकल रॅली काढण्यात येणार असून, त्यानंतर सकाळी ११:१५ वाजता शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा मुख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. देशासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या वीर जवानांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित या कार्यक्रमास नांदेड जिल्ह्यातील तसेच शहरातील सर्व पक्षीय नेते, अधिकारी, सर्व विभागातील कर्मचारी, नांदेड शहरातील जनतेने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com